DECEMBER 31

मी सगुण-दुर्गुण असल्याचे मला माहीत असल्याने मलाही संकोचायला होते !

यात सर्वांनीच चर्चेला तयार असायला हवे -- कुणी एक ' अधिकारी ' असू शकत नाही --

सगळ्यांनी आपापले निष्कर्ष घट्ट पकडून ठेवायचे याचा अर्थच नेमका प्रश्न समजून घ्यायला नकार द्यायचा !

तसे करण्यात कवितेचे काही आयाम आपणच नष्ट केल्यासारखे होते -- कविता अनेकदा वाचून स्वत:त उलगडू दिली पाहिजे -- बौद्धिक पद्धतीने ती नष्ट होते -- कारण खूपच अर्धवट बोलले जाऊ शकते --

झोपडपट्टी
मुंबईत एकदा, कुठून ते आठवत नाही, पण, कारने सहकुटुंब घाटकोपरला जाताना, मध्यरात्री, आम्ही धारावी झोपडपट्टीत शिरलो होतो. तो परिसर बराच मोठा आहे. मागे फिरणे शक्य नव्हते आणि हा रस्ता योग्य ठिकाणी बाहेर पडेल याची खात्री होती. या झोपडपट्टीत आपण जगलेले तर नसतो. पण, तिथले उद्योगधंदे, गुन्हेगारीचे वातावरण यांची ऐकीव माहिती असते. त्यात आपली कल्पना भरही घालत असते. असा मिळून तो अनुभव सुप्त मनात जमा होतो. ‘ खरा अनुभव ‘ असे काही नसते. त्यातच, एकीकडे असेही ऐकलेले असते की अमुक ठिकाणी कारच्या फ्रंट काचेवर अंड्याचा बलक टाकला जातो आणि तुम्ही वायपर चालू केला की तो बलक काचेवर पसरतो आणि तुम्हाला दिसेनासे झाल्याने गाडी थांबवावीच लागते. त्यानंतर तुम्हाला लुटले जाते. आता हेही इकडे जोडले जाते. हा नुसता भयाचा अनुभव वाटत असला तरी कवितेत येताना तो मानवी संबंध आणि मतमतांतरे यांच्या झोपडपट्टीचे रूप घेऊन येतो. सर्व भूमिका आणि मतमतांतरे ही अभावग्रस्ततेतून येतात, याची एक जाणीव असते. इथे कुणी कुणाला कंडेम करणे वा कमी लेखणे नसते. सुप्त मनातले ‘ खोटे अनुभव ‘ आणि जगण्याची प्रक्रिया हे एकत्र येऊन एक खोटी, ‘ निरर्थक ‘ कविता त्यातून अभिव्यक्त होते. ( हे, वर इथे दिलेल्या कवितेच्या संदर्भातले आहे. ही अर्थातच पूर्ण प्रक्रिया नसणार. तरीही, फ्रेंडसना थोडा अंदाज यावा म्हणून हे इथे दिले आहे. )

रस्ता चुकणे हेच जगणे होण्याची अवस्था --

अभावांची ची वस्ती --

रागावलात कि काय ? कवितेने त्रास होत असेल तर तुम्ही न वाचणे बरे !

ताकाच्या ऐवजी लस्सी केली तर त्याचा थाट एकदम उंचावतो !

किती आत्मविश्वासाने विचार मांडतात लोक !

कारण माझी कविता हिंसक आहे कि ती दुसर्याच्या सवयींना आव्हान देत असल्याने त्यांना हिंसक वाटते -- असे फाटे फुटतील --

आपण आपल्यात बोलु या --

ही माणसाच्या जगण्यातली गोची मांडलीय --

' मौज ' दिवाळी अंकात आलेल्या माझ्या ' खडक ' या एकांकिकेला त्यांची चित्रे होती, ते आठवले !
( वसंत सरवटे ).

कविता न आवडल्यामुळे की न पोचल्यामुळे ?

म्हणूनच, उत्तरे वेगवेगळी येऊ शकतील, असे म्हटले आहे --

मुळात नाटक ही एक समूहातर्फे सादर होणारी कला असल्याने त्या प्रक्रियेतला प्रत्येक घटक महत्त्वाचा असतो – आपापल्या जागी प्रत्येक घटकाची आपापली सर्जक देन असते. कोणतीही कलाकृती ही पूर्णपणेच विचारात घ्यायला हवी. इथे विषय असा दिसतो की नाट्यमाध्यमात लेखक अधिक महत्त्वाचा की दिग्दर्शक ? याबाबत विचार करताना, नाटके अनेक प्रकारची असतात, हे लक्शात घ्यायला हवे. ‘ नाटक एक तर चांगले वा वाईट असते ‘ असे ढोबळ विधान उपयोगाचे नाही. समजा, ‘ एक शून्य बाजीराव ‘ आणि ‘ अश्रूंची झाली फुले ‘ या दोन्ही नाटकांचे प्रयोग उत्तम झाले, तर आपण काय म्हणू ? माझ्या मते संहितेची – आशयाची खोली, विषयातली गुंतागुंत आणि त्यातला मानवी जगण्याबाबतचा आवाका हे सर्व महत्त्वाचे असतेच. त्यासाठी लेखक म्हणून कुणी एक व्यक्ती असली पाहिजे, असेही नाही. नाटक हे एक नट आणि एक प्रेक्षक एवढ्या सामग्रीवर घडू शकते, असे म्हटले गेलेले आहे. तरीही, कुणीतरी त्यातला आशय, त्यातली सर्जक प्रक्रिया उलगडत जावे लागतेच. ते काम एक वा अनेक व्यक्ती मिळूनही करू शकतील – त्यांत दिग्दर्शकही असू शकेल. ते

नाटकातले महत्वाचे काम आहे, असे मला वाटते. 'वेटिंग फॉर गोदो ' किंवा ' सिक्स कॅरॅक्टर्स – ' अशी नाटके ही मुळात लेखकाचीच असतात. त्या नाटकांची सर्जक प्रक्रिया निरनिराळे दिग्दर्शक निरनिरळ्या प्रकारे उलगडून दाखवू शकतात. या प्रक्रियेत प्रत्येक नटाचीही मोठी देन असते. तरीही, मूळ नाटकाचे आव्हान हे लेखकानेच उभे केलेले असते. लेखक त्या सर्जक प्रक्रियेची सुरुवात करून देणारा म्हणून महत्वाचा असतो. प्रत्येक वेळी नाटकाचा आशय आणि हेतू लक्षात घेत, कोण अधिक महत्वाचे याची उत्तरे वेगवेगळी येऊ शकतील

पाहिली ती चर्चा -- सचिन केतकरांचे खूप चांगले काम आहे मराठीत -- त्यांनी बऱ्याच मराठी कविता इंग्रजीत अनुवादितही केलेल्या आहेत -- त्यांच्याबद्दल मला आदर आहे -- तरीही मतभेद असू शकतात -- माझ्या आकालानाप्रमाणे तिळवे हे मराठीतले एक महत्त्वाचे कवी आहेत --

नाही हो, खरेच असे होऊ शकते --

होय -- ते एक राहिले होते सांगायचे -- पोस्ट मध्येही वाढवले --

Champra Deshpande commented on Shridhar Tilve's post.
ही मराठीतली एक अपवादात्मक ग्रेट कविता आहे ! मन:पूर्वक सलाम ! एका एका प्रश्नाचा वा दु:खाचा विषय हाताळणाऱ्या खूप असतात कविता -- पूर्ण जगण्याचा आवाका घेणारी अशी ही कविता, हे मराठीचे भाग्य आहे !

हिंदुत्ववाद आवडतो पण साम्यवादाने पोट दुखते किंवा उलटे -- हे प्रश्न जरा अवघड असतात, एवढेच --

तरीही, असा फाटा नको फुटायला म्हणून थोडा बदल केला --

पुरुषसत्ता चालु ठेवण्यात कसले तारतम्य ?

त्यालाच इथे आंतरविरोध म्हटले आहे ! सगळेच या समर्थनाचा आधार घेतात !

चर्चेचे व्यसन -- दुसरे काय !

गरज नसताना अप्रस्तुत शब्द वापरणे ही भाषेची मर्यादा ?

Champra Deshpande replied to his own comment.

' संदर्भ ' हा शब्दसुद्धा ' त्या ठिकाणी ' प्रमाणेच बर्याचदा भोंगळपणानेच वापरला जातो --

' संदर्भ ' हा शब्दही आता रुटीन वापरात असतो --

लबाडीशिवाय माणूस दुसरे काही करूच शकत नाही, हेही लक्षात घ्यावे का ?

Champra Deshpande commented on Pradnya Daya Pawar's post.

रात्रीच्या

खारट दुःखाला

खदाखदा हसणारी

-- या ओळींमुळे असंख्य गुंतागुंतीची स्पंदने येतात कवितेत !

Champra Deshpande commented on Pradnya Daya Pawar's post.

ग्रेट काळी कविता ! जगण्यात अशा असंख्य शक्यता असतात, याचा अर्थच, अमुकच एक सत्य, असे नसते ! ग्रेट कविता आपोआप तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात जाते !

स्वत:चे पूर्वग्रह बाजूला ठेवून त्या गोष्टीकडे पूर्ण लक्ष देणे --

अस्तित्वाचे आरस्पानी सौंदर्य !

सरस्वती डावपेच करायला लागली की लक्ष्मी येते पण, सरस्वती ही सरस्वती राहत नाही !

मी स्वत:हि अजून तालीम पाहिलेली नाही -- अजून त्याला नीट, रोज अशी सुरुवात झालेली नाही --

अनेक अडचणींतून ' घोकंपट्टी ' या नाटकाच्या तालमी तर चालु आहेत -- कधी येते, ते पाहू --

किमान ३० वर्षे -- ३० वर्षांपूर्वीच्या काळाला इतिहास म्हणायचे, असे ठरलेले आहे -- पण, इथे १०-२० ही चालातील -- -- आपणच ठरवायचे --

या पोस्ट च्या निमित्ताने, वाचनीय कवितांची एक चांगली यादीच तयार झाली ! सर्वांना धन्यवाद !

माझ्या मते, आरती प्रभू . अस्तित्वाच्या प्रश्नांना सामोरी जाणारी कविता म्हणून.

संत कवी वगळून, असे म्हणू --

माझे म्हणशील तर ना मी कुणाचा भक्त आहे ना द्वेष्टा -- मी एकाच मताला धरूनही बसत नाही --

असे नेते असल्यावर हे सगळे चालणार ! हे हवे आणि ते नको, हे कुणी कुणाला सांगावे ? ' आदर्श ' नेते वा नागरीक कोणते, हे कसे ठरवणार ? जो तो स्वतंत्र असणार ! माझे ' कळणे ' हेच फक्त सेन्सिबल -- हे सहिष्णुतेत बसणार नाही !

खरे समजून चालाणार्यांचेही तेच ! -- हीच तर शोकात्मिका !

स्पष्ट मत म्हणावे तर -- राहुल हा मला एक पोरकट, थिल्लर नेता वाटतो -- कोन्ग्रेसावले का त्याच्यामागे असे फरफटत जात आहेत, कळत नाही --

या माझ्या पोस्ट ला मिळालेला हा भरघोस प्रतिसाद म्हणजे एक संदेशच समजावा की काय -- हा एक नवाच प्रश्न समोर आलाय !

हीच तर आहे एफबी व्यसनाची गंमत !

फ्रेंडसवर इतका अन्याय कसा करणार हो ?

माणसाने एक तर हिम्सावृत्तीपुढे हर पत्करलेली आहे किंवा शोध घेण्याच्या नावाखाली तो नुसती हिंसेची विविधता बघत बसतो !

बेसलेस होत नाहीयत तोवर संभाळून घेऊ !

व्यक्तिगत सुखदु:खे, मते, पूर्वग्रह यांच्या कलेला तो कमी लेखतोय -- ते बरोबर वाटते. modern कलेला तो फोटोग्राफिक म्हणतोय, तिथे काही घोटाळा असावा.

नास्तिकांनाही आस्तिक करणारा देश ! ' देवावर भरोसा ! ' हेच मनी बिंबवणारा !

" भारतमाता, तुझे कुछ नाही आता ! " -- संत परेश रावल. ( चित्रपट कोणता ? )

Babasaheb in his book 'Buddha and his Dhamma' clearly lists out what constitutes Dhamma and what not, as propounded by the Buddha. That which "constitute Dhamma" are - to maintain purity of life, to reach perfection in life, to live in nibbana, to give up craving, to realize that all compound things are impermanent, and to realize that Kamma is the instrument of moral order. That which "does not constitute Dhamma" are - the belief in the supernatural, belief in Isvara (god), believing in a dharma based on union with Brahma, belief in the soul, belief in sacrifices, belief based on speculation, only reading books of dharma or dhamma, and belief in the infallibility of Books of dharma or dhamma.

यातले -- to live in nibbana -- यावरून असे दिसते कि ' निर्वाण ' म्हणजे मृत्यू असा नसावा अर्थ –

म्हणजे -- दु:खमुक्ती म्हणजे निर्वाण नव्हे ?

मला ती आवर्तनांची कल्पना फार आवडली ! आणि काही आवडले की मी बर्याच वेळा दिलखुलास अतिशयोक्ती करतो !

१ सध्या नम्रपणाची चलती दिसतेय तर तो आत्मसात करा ना !
२ ‘ साम, दाम, दंड, भेद ‘ हे महत्त्वाचे असतेच हो – त्याचबरोबर नम्रपणाचीही जोड द्या ना !

ते सगळे मिळून कल्हई जगाच्या डोक्याला करत राहतात !

The Trap Poem by Nicanor Parra - Poem Hunter

poemhunter.com

सुरुवात केलीय वाचायला -- ग्रेटच ! -- हा नव्हता माहीत मला --

२५ वेळा वाचायची -- शब्दार्थ तर पाहायचेच -- हा स्वर्ग स्वकष्टानेच पाहावा लागतो, इलाज नाही !

अशा आवाक्याची कविता तोच कवी लिहू शकतो ज्याला मानवी मनाची कार्ये आणि कारवाया यांचे इत्थंभूत आकलन आहे !

साईटवरचे लेखन अभ्यासणे, पुस्तके अभ्यासाला लावली जाणे -- असे घडत नाही --

पुस्तक रूपातच वाचणारे खूप आहेत -- हे सर्व लेखन गेली काही वर्षे वेबसैटवर उपलब्ध असूनही ते मराठीत ' नसल्यासारखेच ' राहिलेले आहे.

हरकत नाही, पण, वितरणाचे प्रश्न येतात. गठ्ठे पडून राहतात.

' हात लावीन तिथे कविता ' असा हा प्रकार आहे --

छान ! यात आकलनाचा काही एक धागा आहेच -- कलात्मकतेचेही अवधान आहे --

यात अभिव्यक्तीस्वातंत्र्य खूप वाढवून घेतलेय --

भरकट कविता, अपघाती कविता, सर्किट कविता, असंबद्ध कविता, निरर्थक कविता, गोंधळ कविता, मुक्त कविता -- असे काहीही ! किंवा मग ' काहीही कविता ' !

-- तरीही, काहीतरी म्हणायचे म्हणून -- हेच नाव, असा आग्रह नाही --

न-कविता --

हे सगळे ' कविता ' म्हणून ' न-कविता ' लिहिणे आहे -- मला हा मार्ग खूप अर्थपूर्ण दिसतोय --

तसली कालबद्ध बिरुदे शेवटी निरर्थकच ठरतात -- आता तर post post post असे तीनदा लिहावे लागते !

बिरुद द्यायचेच झाले तर anti hero किंवा anti play अशा जरा जुन्याच धाटणीचे पण मराठीत फारसे प्रचलित नसलेले असे ‘ न-कवी ‘ चालु शकेल. म्हणजे कविता म्हणून, रूढार्थाने कविता नसलेले, काही लिहिणारा.

शेवटी विचार असाच झाला की आपल्याला नकोच हे बिरूद -- आपण आहोत ते आहोत !

आता भडकवाभडकवी करून पुढे काय असू शकतो विचार ?

तुम्हाला जड, बोअरिंग वाटतेय तर नका ना वाचू -- इतके सोपे आहे -- का त्रास करून घेताय -- कोणत्या वयात कुणी काय करावे याची शिस्त सगळ्यांना लावायचाही त्रास खरे तर नका घेऊ -- शांत, मजेत जगत राहा --

मग नका लावून घेऊ स्वत:ला --

सततच हेटाळणी करत रहावेसे वाटणारे सगळे -- मी असो वा तुम्ही.

विरोधी मत म्हणजे हेटाळणी नव्हे --

काहीच नसण्यावर आधारित अशी कल्पना असू शकत नाही -- मन हे ज्ञातातूनच काम करते.

अर्थात -- सर्जकतेत अमर्याद वैविध्य असू शकते !

नुसते तुकडे म्हणजे सर्जकता नव्हे -- त्यांना काही वेगळे म्हणायचे असावे -- नुसते तुकडे म्हणजे अनुभव आणि अनुभवाला आलेली कलावंताची प्रतिक्रिया -- आणि प्रतिक्रिया म्हणजे सर्जकता नव्हे.

अनेकांनी आपापले आकलन दिले आहे, मी माझे देतोय. सर्व मिळून ज्यानेत्याने याकडे पाहावे.
या प्रश्नात अनुभव आणि कला ( म्हणजे अभिव्यक्तीतले कौशल्य ) गृहीत धरलेले आहे. सर्जकता म्हणजे काय ते पाहायचे आहे. अनुभव ही मनाचीच कृती असते. अलगतेमुळे मन विदीर्ण असते तसाच अनुभवही विदीर्ण असतो. म्हणजेच तो व्यक्तिगत मर्यदांनी युक्त असतो. या व्यक्तिगत मर्यादा टाकल्या गेल्या तर अनुभवाचे समग्र आकलन होते. इथे मनाचे सवयीतले सातत्य लोप पावते. मर्मदृष्टी ती हीच. ही दृष्टी म्हणजेच सर्जकता. ही सर्वांना सर्व काळात प्रस्तुत असते. थोडक्यात, सर्जकता ही व्यक्तिगत प्रतिक्रिया नसते. मानवी प्रश्नांकडे परिपक्वतेने पाहण्याची ही दृष्टी असल्याने मौल्यवान असते.

' राजा ' वाचायला हवे ! आपले मित्र प्रशांत बागड यांनी लिहिलेला कांट वरचा एक लेख वाचला ! कवितेबाबत किती मुलभूत विचार ! Value बाबत विटगेस्ताईन आणखी काय म्हणतो ते थोडक्यात सांगितलेत तर बरे होईल --

मानवी अनुभव हेच तर कलेचे अंगप्रत्यंग असते.
मग, कलेतली सर्जकता म्हणजे काय ?

कलेला नुसतीच करमणूक करणारी दासी मानण्यात मानवी प्रश्नांबाबतची पूर्ण बेफिकिरी दिसते.

तुझी बरीच मते मला विषयापासून लांब जाणारी वाटतात -- सर्जक कला म्हणजे काय याचा विचार तू नीट मांडावास --

इतके सगळे असून ऑस्करला कुठला पाठवावा हा एक वेगळाच प्रश्न पडतो !

मग तर संवेदनशील कुणीच असू शकत नाही -- गज्वी म्हणतात तेही नाही !

पूर्ण कवितालेखन या अंगाने करणारे फक्त आरती प्रभू. इतर अनेक कवींच्या अशा उत्तम कविता आहेत -- त्यात अरुण कोलटकर, दिलीप चित्रे, गुरुनाथ धुरी, प्रभा गणोरकर, रामचंद्र वामन कदम -- ही नावे आठवतात. माझा दुसराही एक आक्षेप अस आहे की सौन्दार्यलक्षी कविता का नाकारावी ? उदाहरणार्थ पु शि रेगे ? या कवितेला असंवेदनशील म्हणणार ?

कविता उदाहरण म्हणून आहे -- सर्व कलेला हे लागू आहे --

उदाहरणासाठी कवितेचे प्रयोजन म्हटले आहे --

कलेसाठी कला म्हणजे समग्र भान हा गैरसमज आहे. जीवनासाठी कला हेही त्याच लायनीतले एक तत्त्व. ' कवितेचे प्रयोजन ' ही माझी पोस्ट कदाचित माझे म्हणणे अधिक स्पष्ट करू शकेल.

तुकाराम, आरती प्रभू, कोलटकरांच्या काही कविता, फर्नांडो पेसोआ, व्हीटमन, एलियट -- असे बरेच आहेत.

प्रयोजन या विषयावर स्वतंत्र पोस्ट दिली आहे -- ती पहावी --

फेसबुकवर उत्तम कविता लिहिणारेही बरेच आहेत -- हे काही मूल्यमापनाचे साधन नाही होऊ शकत -- अनेक मासिकांत ९० टक्के कविता साधारणच असतात -- एकूण जगातच ! मग ?

फेसबुक कवी आणि फेसबुकबाह्य कवी असा फरक मला बेगडी वाटतो. फेसबुकपूर्वीही मी कविता लिहीत होतो आणि आता माझ्या सर्वच कविता फेसबुकवरही देतो. त्यामुळे काही फरक पडत नाही. कविता ही भावनिक असली पाहिजे वा अमुक एक विचार पटवणारी असली पाहिजे, असे मला वाटत नाही.

कवितेला कविनिरपेक्ष अस्तित्व असते.
आधी कवीला समजून घ्या, मग कविता -- याची गरज नसते.

मी स्वत: पुरोगामी-प्रतिगामी असे काही नाहीय -- आस्तिक-नास्तिकही नाहीय -- ही कविता नीट समजून घ्यावी लागेल -- आणि कवितेतला मी म्हणजे मी नव्हे --

कुणीही -- मोकळे विचार करणारा --

म्लान म्हणजे कोमेजलेला, खिन्न -- तसा नसलेला म्हणजे अम्लान.

मन पूर्ण नीतिमान, पूर्ण अनीतीमान, पूर्ण दुष्ट, पूर्ण सज्जन वगैरे असे काही नसते. ते नेहमी द्वंद्वात्मक पद्धतीने काम करते. ताबा ठेवणारा आणि ताबा ठेवला जाणारा अशा दोन भागांत ते काम करते. या दोन्हींत ताण असतो, खेच असते. ती कमीअधिक तीव्र असते. समाजमान्य प्रमाणात ते चालते. उदाहरणार्थ माझ्या मनात अनीतीचे विचार येतात पण मी ते

दडपतो -- असे. सतत या ताणात असणे याला विकृती म्हणता येते. हा ताण -- ही द्वंद्वात्मकता नसणारे एकसंध मन हे तसे व्यक्तिगत मन नसते -- त्याची व्यक्तिगत ओळख गेलेली असते.

' कादंबरी ' या विषयावरचे नेमाड्यांचे लेखन वाचा --

स्वत:च्या भाषेत, बोलण्याच्या पद्धतीत काहीच चूक नाहीय, असे सर्वांनाच वाटणे -- हाच तर एक रोग होऊन बसलाय ! मतभेदांतला संघर्ष तीव्र आणि असहिष्णू करणारा !

एकाला भक्त म्हटले की त्याच्या विरोधी असणारा हा आपोआप द्वेष्टाच ठरतो !

एक वेगळ्याच प्रकारचे अवलंबित्व !

' सत्य ' म्हणजे ? मला पटते ते ?

मानवी मूल्यांची वगैरे वाक्ये सगळेच वापरतात ! सगळेच एकमेकांना हुकुमशहा आणि असहिष्णू म्हणतात !

मतच मिथ्या असते हे ऐहिक जगासह आणि तेही ओलांडून जाणारे सत्य आहे ! पण, इथे कामे करताना विचार, मते लागणार --

तेवढे मृत्यू होईपर्यंत थांबू या ? उपरोधिक बोलतानाही जरा भान ठेवलेत तर बरे होईल --

तुम्हीही तेच म्हणत आहात की अनेक मान्यवर टोकाची विरुद्ध मते मांडत आहेत -- तुमचेच बरोबर, हे न समजणारे असणारच ना -- आणि तशांची संख्याच जास्त दिसते आहे --

पोस्ट पुन्हा एकदा वाचा -- मी तुम्हाला दिलेले उत्तरही वाचा -- या विषयात माझी बौद्धिक समज खूपच कमी असू शकते -- एक नागरिक म्हणून माझी गाडी एकूण इम्प्रेशन्सवर चालते --

मी जनतेतल्या सामान्य नागरिकांपैकी एक आहे. एवढे मोठे विश्लेषण करणारा कुणी विद्वान नाही. एकमेकांच्या विरुद्ध विश्लेषणे करणारे विद्वान दिसतात. ते सगळे पाहून सामान्य जनता आपल्या साधक-बाधक आकलानातून वागत असते.

त्याबाबतची आणि त्यातून काय दिसते, यावर ही पोस्ट आहे. तुमचा चांगला अभ्यास असावा, असे दिसते. तुमच्या म्हणण्यातही तथ्य असणारच. तरीही, सध्याचे चित्र पाहून ही पोस्ट दिलेली आहे. जनतेसमोर अनेक प्रकारचे विद्वान असतातच !

होय -- मान्य -- विचार आणि विचारात आकलन नसते -- असे दोन्ही !

अलगतेने जगण्यासाठी मी सोडून इतर सगळ्याशी विरोधात असावे लागते ! हे जर आनंदाचे म्हणायचे असेल तर द्वेष, छळ, विषमता या सगळ्याचेच ते समर्थन ठरेल !

दु:ख म्हणजे मनाची विरोधी अवस्था -- असे नसेल तर कशाला बुद्धाने हा विषय महत्त्वाचा मानला, कोण जाणे !

संघर्षमय असणे आनंदाचे ? मग तर सगळाच आनंद ! ' आनंद ' हा शब्द कोशात असायची गरजच नाही !

या टीमने माझे हे नाटक सखोल उंचीवर नेऊन अमर केले ! ज्यांनी पहिले ते अजूनही दिलखुलास बोलतात या नाटकाबद्दल !

किंवा ' प्रायोपवेशन तालीम ' ?

अकोले म्हणजे संगमनेर जवळचे ना ? सहा महिने होतो मी त्या गावात ! अति-सुंदर गाव !

भाषणानंतर त्याचा लेख करून जमल्यास इथे आमच्यासाठी द्यावा --

समज या ' मूर्ख ' पोस्ट आहेत -- तरीही त्यात रागावण्यासारखे काय आहे ? अन्यथा, हेकटपणाला पिन लावणेच आवडत नसावे ! किंवा त्यांची बाजू न घेणे ! एक माणूस -- एक मत, या न्यायाने मी बोलतोय, इतकेच --

माझा या शहाणपणाला ( Wisdom ला ) पाठिंबा आहे !

मला सगळ्या विषयांतले कळते, अशी इमेज मला नकोच आहे -- शिवाय इथे मी ' निर्णय ' स्वरूप मते मांडत नाहीय -- अनेक विषयांवर अनेकांचे विचार समोर यावेत, हाच हेतू आहे -- तरीही, धन्यवाद !

' प्रत्येक मत हे पूर्वग्रह दूषितच असते ' यावर विचार व्हावा -- कोणत्याही मतधारकाने हेकट होणे, हे लोकशाहीला घातक आहे !

तुम्ही हे कोणत्या अधिकारात सांगत आहात ? अनेक फ्रेंडसना या मुद्यांत इंटरेस्ट आहे, हे स्पष्ट दिसतेय -- तुम्ही सहिष्णू राहणे योग्य होईल, असे नाही वाटत ?

मी इथे दिसणारे आणि माध्यमांत असणारे विषयच चर्चेला घेतो आहे -- तुम्ही तज्ञ असाल तर तुम्हाला माझ्या पोस्ट टूकारच वाटणार -- मी तज्ञ नाहीय -- त्यामुळे, तुमची मर्जी !

पूर्णपणे याच्या उलट बोलणारेही तज्ञ दिसताहेत -- त्यामुळे, सध्या, ना तुमच्यावर विश्वास, ना त्यांच्यावर !

यावरून, ' चोरीचा मामला ' या उत्तम मराठी चित्रपटातले एक दृश्य आठवले. एक गुरखा आणि एक हातगाडीवाला असलेले निळू फुले या दोघांनी मिळून, एका तळघरात लपवलेल्या धनावर डल्ला मारलेला असतो. आता जवळ मुबलक धन असूनही त्यांना एक वेगळाच प्रश्न सतावत असतो. मोठ्या रकमेची नोट घेऊन काही खरेदी करायला जावे तर लोक संशयाने पाहतात – याच्याकडे कशी काय ही नोट, असे चकित होतात. एकदा रस्त्यात ते दोघे भेटतात. निळू फुले विचारतात, काय रे, कुठे गेला होतास ? तो गुरखा म्हणतो, स्टेशनवर तिकीट काढायला. निळू फुले विचारतात, काय कुठे गावाला चाललास काय ? यावर तो गुरखा म्हणतो, नाही नाही, तिकीट काढायचे आणि पैसे सुटे करून घ्यायचे, असे करतो हल्ली !
-- याला म्हणतात, कलावंताचा द्रष्टेपणा !

एक पुढारी असे म्हणाल्याचे पहिले टीव्हीवर --

हे मला फारसे न कळणारे विषय आहेत -- म्हणून तर मी मते विचारतोय -- त्यातून काही एक इम्प्रेशन बनवून मी माझे मत तयार करणार --

हळूहळू याचा अर्थ असाच होतो की मी म्हणेन तीच लोकशाही !

म्हणूनच पोस्ट मध्येच म्हटले आहे -- ' सर्वांनाच असहिष्णुतेची पूर्ण मुभा देणारी व्यवस्था ' -- हाच लोकशाहीचा गौरव !
माझे ते स्वातंत्र्य आणि दुसऱ्याची ती असहिष्णुता !

तसे काही सिद्ध करता येत नसेल तर तो बहुमताचा कौल म्हणून मान्य करावा !

लोकशाही प्रक्रियेने झालेला निर्णय न स्वीकारणे -- ही सहिष्णुता ?

बँकेत काम करणाऱ्यांना देशाचे अर्थशास्त्र कळते, असे काही नसते --

अरे, देशाचे अर्थशास्त्र ही एक वेगळीच गोष्ट आहे -- सध्या बँकेत काम करणाऱ्या काहीजणांशी या विषयावर बोलुन बघ --

पूर्ण चांगला किंवा पूर्ण वाईट असा मेंदू मुळी असूच शकत नाही हो ! हे समजून घ्या आणि करा विचार !

थोडे गंमतीनेही बोलावे, हे मान्य असणाऱ्यांसाठी आहे ही पोस्ट --

' प्रेमच म्हणू याला हवं तर ... '

बरे झाले ही एक बाळबोध गोष्ट मला सांगितलीत ! सहन करण्याचे आपण आता कुठे कुणाला शिकवत बसावे ! ते अंगवळणी पडलेले असते !

मुंगी म्हणजे जीवात्मा, सूर्य म्हणजे परमात्मा वगैरे अर्थ ओढूनताणून लावताही येईल, पण माझ्यामते ते "रिडींग टू मच बीटवीन द लाईन्स" होईल. या ओळींना लाक्षणिक अर्थ वगैरे काही नसावा. वाचल्यावर समजणारा शाब्दिक अर्थ, हाच खरा अर्थ समजावा.

एक आठवण म्हणून --

मुंगी उडाली आकाशीं ।
तिणें गिळीलें सूर्याशीं ॥१॥

थोर नवलाव जांला ।
वांझे पुत्र प्रसवला ॥२॥

विंचु पाताळाशी जाय ।
शेष माथां वंदी पाय ॥३॥

माशी व्याली घार झाली ।
देखोनी मुक्ताई हांसली ॥४॥

यातही आता राजकारण होणार. मतांची भीक मागण्यासाठी नास्तिक लोक धार्मिक कार्यक्रम करू लागले तर, त्यांचे हे खोटे वागणे म्हणजे देवाचा आणि जनतेचा अपमान करणारे आहे, असे म्हणून आस्तिक लोक या नास्तिक लोकांचे धार्मिक कार्यक्रम उधळूण लावतील !

आयुष्यभर घासघासून अभ्यास केला पण मुख्य गोष्टच, जी विना अभ्यास कळू शकली असती, तिच्याकडे लक्षच गेले नाही ! आपण नास्तिक असल्याचे लोकांना माहीत असल्याने इथे आपल्याला फारशी कुणी किंमत देणार नाही – ही ती गोष्ट ! इतकी साधी गोष्ट इतक्या वर्षांनंतर डोक्यात यावी, हा मानवी बुद्धीचा अपमानच म्हणायला हवा !

शिवसेनावाले आणि साम्यवादी असे सर्वच कपाळावर कुंकू लावून गल्लोगल्ली एकोप्याने सत्यनारायण साजरे करताहेत -- हे दृश्य किती विलोभनीय दिसेल !

रेडीयोवरच्या एका कार्यक्रमात ही माहिती ऐकली .

आहे या मनाने माणूस अहिंसक होत नाही -- मन वापरण्याच्या पद्धतीतच क्रांती होणे आवश्यक आहे, असे काही कलावंतांना वाटते -- तो मार्ग समग्र भानाचा असतो --

ज्यांना प्रचार महत्त्वाचा वाटतो त्यांनी तो करावा -- पण समग्र भान हे माणसाच्या तशा हिंसक प्रवृत्तीच प्रश्नांकित करते -- दुसरे म्हणजे तशा हिंसक प्रवृत्ती फक्त एका घटनेत, फक्त अमुक माणसांतच असतात, असे नाही -- त्या सगळ्या माणसांत असतात --

उलट, वाचनीय मजकूर फारसा नसल्याने किती भराभर वाचून संपायचे पेपर्स ! कित्ती छान होते ते --

निष्कर्षहीन पाहणे -- ' मत ' म्हणजे तुकडाभान --

चांगल्या कवितांची आवड असलेले वाचक, कविता समजण्याची समृद्ध, गुंतागुंतीची पण एकसंध अशी प्रक्रिया तिच्यातल्या गहन आशयासाठी हासील करत राहतात.

सर्व घटना मनाच्याच असतात -- तशाच याही -- पूर्ण सत्य !

Champra Deshpande commented on Mohit Takalkar's photo.
'Rangashankara Repertory Actors hauling up the sets of 'Beediyolagondu Maneya Maadi' for the Dress Rehearsal. One more day to go.
We play on 1st November, 7:30 pm at Rangshankara on Rajyotsava Holiday.
Playwright: Champra Deshpande
Translation: Shripati, Surendranath
Direction: Mohit Takalkar

Book your tickets on
https://in.bookmyshow.com/bengaluru/plays/beediyolagondu-maneya-madi/ET00047749'
पूर्ण टीमला मन:पूर्वक भरपूर शुभेच्छा !

त्याप्रमाणे तुम्ही हा विषय संपवून निवांत राहू शकता ! Nobody cares --

चलो, फ्रेंडस, सर्वांना दीपावलीच्या भरपूर शुभेच्छा ! ( उद्यापासून नवे वाद घालु ! )

' बाळबोध ' हा शब्द कुणीही कुठेही वापरू शकतो -- ती ट्रिक फारशी कामाची नाही --

पाप, पुण्य हे नाकारायचे आणि पावित्र्य स्वीकारायचे !

भेसळीची दारू चढते लौकर पण आरोग्याची तुलनेने खूप जास्त हानी करते !

तोच प्रश्न उपस्थित केलाय -- पाप, पुण्य -- हे नाकारले जातेय तर गंगेच्या पावित्र्याचा स्वीकार कशाला ?

गंगाच कशाला हवीय ? कोणतेही वाहते पाणी चालले असते --

दोन उथळ गोष्टी जोडून एक खोटे गांभीर्य तयार करणे -- अशा गम्मतीसाठी ही पोस्ट होती -- असो --

अहो, एक गंमत चाललीय ! दोन्ही कलाकृती फार गंभीरपणे घ्याव्यात अशा नसल्याने जरा मजा, इतकेच !

स्थिर असणे आणि बदल स्वीकारणे -- हे दोन्ही गुण असतात भाषेत.

तुम्हाला काय म्हणायचेय हे जर मला समजायचीच गरज वा शक्यता नसेल तर भाषा हवीच कशाला ?

तुमचे काय म्हणणे आहे -- शब्दार्थ आणि व्याकरण यांच्याशिवाय भाषा चालते ? आपण लहान मुलांचे वगैरे अपवादात्मक बोलत नाही आहोत.

Champra Deshpande replied to Arun Bhalerao's comment.
भाषेत शब्दकोश असतो आणि बरेचसे पाळले जाणारे व्याकरणही असते ! सगळेच साळढाळ झाले तर माणसाला पक्ष्यांसारखे आवाज काढत फिरावे लागेल ! ते आवाजही ठरलेले असतात असे पक्षितज्ञ सांगतात -- मादी नराला प्रेमाने बोलावत असेल तर ' ये आता, दाखवते तुला इंगा ' असा आवाज नाही काढत !

post modern वाले म्हणतात की मूळ कलाकृती असे काही नसतेच -- त्या अर्थाने आपण बोलत नाही आहोत --

उद्योग-धंद्यांत अर्थाचा अनर्थ झाला तर कोट्यवधींचे नुकसान होऊ शकते -- तिथे संपर्क-कौशल्य ( communication skill ) खूप महत्त्वाचे असते !

याचा अर्थ भाषा हे एक अराजक होऊनही चालणार नाही -- हळूहळू बदल होत असतातच !

भाषेशिवाय एक मिनिटही जगू न शकणारे मन , भाषा अनित्य असल्याचे मान्य करते , हीही एक मौजच !

अपेक्षित संपर्क साधला जाणे, हे भाषेचे महत्त्वाचे कार्य चालु राहावे, म्हणजे झाले !

' माझा आत्मविश्वास जात चाललाय ' , हे मी आधीच सांगितलेय --

प्रास प्रकाशनाची परवानगी न घेता अरुण कोलटकरांची कविता कुणीतरी कुठेतरी दिली होती -- त्याच्या काही कटकटी झाल्या होत्या, असे आठवते --

Absurdity अमर असते --

गोड मिठाई जरा जपून खात्रीशीर दुकानातून घ्या -- भेसळीच्या बातम्या येत असतात --

नि:संशय ! तिळवे एक त्यांची अपवादात्मक आवाक्याची कविता लिहितात !

प्रतिरूपे देणारी कला व्यक्तिगत असते. ती सुखदु:खांच्या साखळीची मनाची सवय अधिक ठळक करते. मनाच्या या सवयीत शहाणीव असू शकत नाही. शहाणीव म्हणजे सुखदु:खांचे व्यक्तिनिरपेक्ष भान.

एवढ्या मोठ्या संखेने मिळणारा ध्येयवादी, प्रामाणिक प्रचारक भाजपखेरीज इतर कोणत्याच पक्षाकडे नाहीय -- ही तर इतरांची पोटदुखी नसेल ?

माती, पाणी, उजेड, वारा
तूच मिसळसी सर्व पसारा
आभाळच मग ये आकारा
तुझ्या घटांच्या उतरंडीला नसे अंत, ना पार !
-- यातली ' आभाळच मग ये आकारा ' -- ही ओळ असू शकते--

घटाच्या आत आणि बाहेरही आकाश आहे -- अशी काही ?

' घट ' किंवा ' घडा ' असलेलीच माडगूळकरांची ओळ -- आठवतेय का ?

धन्यवाद ! या ओळीवर बोलणे झाले होते -- आणि गदीन्च्याही एका गाण्यावर -- आठवले तर सांगेन --

हिंसक होणे म्हणजे माणसांत येणे ! -- हे अर्थातच उपरोधिक आहे !

तुमच्यामाझ्यासारखे खरे लोक उरलेयत कुठे आता जगात ? !

असेच चाललेय मानवी जगणे -- एकातून एक -- एका खोटेपणातून निर्माण होणारी साखळी कशीही जात राहतेय --

कभी हां कभी ना --

माणसे कोणतीही असोत ती आपापले हितसंबंध सांभाळत असतात -- डावे त्याला अपवाद असू शकत नाहीत -- आपद्धर्म या नावाचे ढोंग सगळ्यांचेच चालु असते !

माणसाच्या बुद्धीने परिपूर्ण असे काही घडू शकत नाही -- बरेचसे बरे , असे घडले तरी ठीकच म्हणायचे !

बुद्धि ही एक फारच मर्यादित गोष्ट असते -- जगातल्या सगळ्या प्रश्नांवर क्षणात साकल्यात्मक निराकरण देणे तिला केवळ अशक्य असते ! याचा एक फायदा होऊ शकतो -- हे प्रश्न टाळायचे असले की आधी ते अमुक प्रश्न घ्या असे पिल्लू सोडता येते ! तेही विवेकानेच !

' सर्वांत हुशार, अभ्यासू आणि न्यायी ' लोकांनी बुद्धीप्रमाण्याच्या आणि वैज्ञानिक दृष्टीकोनाच्या मदतीने भूमिका घेताना त्यातला आपला व्यावहारिक फायदा बघणे हे विवेकात बसते का ? की बुद्धीप्रमाण्यावाद आणि विवेक यांच्यांतही एक दरार असते ?

सध्या मला ते काही माहिती नाहीय -- ते समोर येईल तसतसे विचार-विनिमय करूच --

साधन-शुचितेच्या अंगाने बुद्धिप्रमाण्यावाद आणि विवेक या साधनांचा वापर करून यातून काहीतरी मार्ग निघेल, ही आशा आहेच ! यातून ' योग्य ' भूमिका घेण्याचे प्रात्यक्षिकच जन्माला येईल, बहुतेक !

७६ ते ९६ मी तंबाखूचा निस्सीम भक्त होतो --

स्वत:चे ' असणे ' अनिश्चित वाटल्याने भिऊन घट्ट करत राहणे --

सारखे स्वत:ला गिरवत राहणे --

कंसातला शब्द वापरणे मला अयोग्य वाटते . अशा चर्चेला व्यक्तिगत स्वरूप येऊ नये. मजकुराबद्दल मतभेद असू देत.

दुसर्याने काय बोलावे, तिसऱ्याची प्रतिक्रिया कशी असायला हवी, हे कुणीतरी ठरवत राहणे -- हाच तर यातला प्रश्न आहे --

याकडे पाहण्याचे अमुकच अर्थ निघतात असे छातीठोकपणे सांगणारे कोणत्या तरी स्थितीशील भूमिकेत असतात --

ते कळले -- तो विचार ज्यांना पटत असेल त्यांना उत्तर देऊन ठेवले आहे !

देशात राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक सगळ्या गोष्टी चालु राहायला हव्यात -- तिकडे जवान त्यांचे काम करताहेत म्हणून आपण देश मारून टाकायचा नसतो --

हे पुन्हा, सगळे बौद्धिकच असते का, या विषयाकडे जाते -- तो विषय अलीकडेच सविस्तर होऊन गेलाय इथेच -- ( भूमिका -- याबाबत )

उलटेही घडत असते, तेही मोठ्या प्रमाणावर आहे --

माणुसकीची वृद्धी आणि जोपासना कला असंख्य प्रकारांनी करत असते -- ती सतत एकाच प्रश्नावर केन्द्रित असली पाहिजे किंवा अमुकच विचाराची वा भूमिकेची तिने सतत अभिव्यक्ती केली पाहिजे, असे वाटणे, हा सांस्कृतिक हेकटपणा आहे --

कुणी कुणाच्या दु:खाची टिंगल न करणेच बरे -- कुणीही दु:खप्रुफ जगू शकत नाही --

माणुसकी म्हणजे अमुकच, विशेषत: कलेच्या क्षेत्रात, असे होऊ नये, एवढेच --

म्हणजे इतर सर्व संक्स्कृतिक प्रवाह बंद करायचे ? निसर्गकविता लिहिणे म्हणजे माणुसकीचा त्याग करणे ?

मीही साधाच आहे --

सर्व मानवजातीला मान्य आहेच असे यावरून गृहीत धरता येईल असे काय आहे तर -- रक्तपात, अत्याचार, विषमता, हुकुमशाही आणि सततचा गोंधळ आणि अराजक !

समूहा-समूहांच्या मतांतही संघर्ष असतो -- प्रत्येक बाबतीत --

चर्चेत बरेच संबंधित, प्रस्तुत मुद्दे आले की ती चर्चा थांबवावी -- इथे काही सिद्ध करणे शक्य नाही -- जे वाचतील ते करतील आपापला विचार --

खूप प्रेक्षकांना आवडली पाहिजे या विचाराने तडजोडी करत ' तयार ' केलेल्या कलाकृती आणि तशा तडजोडींशिवाय निर्माण होणाऱ्या कलाकृती यांत फरक असतोच -- हे सगळे जग मानते. विनातडजोड निर्माण होणाऱ्या कलाकृतींतही आवाक्याचा फरक असू शकतो --

मग, बोलणेच खुंटणार -- कुणाला ना कुणाला आवडले कि झाले !

परीपक्वतेतून विचार असे असू शकते, असते, पण, कुणीही कितीही कुटून विचार केला तरी त्यातून परिपक्वता येत नाही.

उत्सव, बोंबाबोंब , धिंगाणा , मंडप, रोषणाई, देखावे -- हे सगळे बंद झाले तर घुसमटून मरतील ना लोक ! दयामाया ठेवावीच लागणार !

विवेक हा वयाने, अनुभवाने वा विद्वत्तेने येत नाही -- विवेक म्हणजे बुद्धीच, असे मानले तर सगळेच विवेकी आणि परिपक्व ! मग भाषेत या दोन्ही शब्दांची गरजच राहणार नाही. जगण्याबाबतचे भान, समज, गांभीर्य या गोष्टी बौद्धिक कृती नसतात. हा फरक न पाहणे हेच तर बुद्धिवादाचे प्रमुख वैशिष्ठ्य असते.

कला ही धर्मा इतकीच सिरीयसली घेणारे लोक आहेत -- तो चाललाय विषय.

आपला विषय, गल्लाभरू कला, हा नाही चाललेला.

उदा समाजवादी, साम्यवादी, परिवर्तनवादी -- अशा भूमिका न घेणारे कलेचे खूप मोठे क्षेत्र असते आणि ते खूप महत्त्वाचे असते --

ते समग्र भानाच्या कलाकृतींना हटवून विचारसरणीच्या -- एखाद्या भूमिकेच्या कलाकृतींचे राज्य राहील, असे प्रयत्न करत राहतात --

विवेक म्हणजे सम्यक आकलन आणि सारासार समंजसपणा -- यावरून तुम्हीच ठरावा काय ते -- मी तर पोस्ट मध्ये दिलेलेच आहे --

अशी आधीच पराभूत मनोवृत्ती ठेवली तर लोकशाहीतल्या विचार स्वातंत्र्याचे काय होईल हो ?

जरा वेगळ्या प्रकारे मी एक सत्य सांगत असतो -- पुस्तक वा कोणतेही वाचण्यासाठी असलेले काहीही -- मराठी माणसाचे वाचून झालेय का हे ओळखणे सोपे असते -- त्यावर पोह्यांचे वा भजीच्या तेलाचे डाग आलेत का, हे पाहायचे --

म्हणजे मीना सुखटणकर ना ? ' नाटककाराच्या --- ' हा प्रयोग मी तीनदा पहिला होता --

६८-६९ च्या सुमाराचे असेल तर मी पाहिलेले ' जस्मा ओडन ' तेच होते -- मी त्यावर लिहिलेही होते त्या वेळी एका मासिकात -- मी २२-२३ होतो --

विवेक कुठे असतो ते माहीत नसूनही तो शब्द वर्षानुवर्षे वापरणाऱ्यांना आधी विचारायला हवे ! ( परिपक्वता म्हणजे हेकटपणा नव्हे. इतरांबाबतची सततची आक्रमकता नव्हे. स्वमताचे नसलेल्यांच्या टवाळ्या नव्हेत. )

चेष्टा,टवाळी आणि उपरोध मिसळल्याशिवाय न पटणाऱ्यांशी बोलताच येत नाही अनेकांना --

Champra Deshpande replied to Premanand Gajvee's comment.
To end suffering, one must cut off greed and ignorance. This means changing one's views and living in a more natural and peaceful way. It is like blowing out a candle. The

flame of suffering is put out for good. Buddhists call the state in which all suffering is ended Nirvana. Nirvana is an everlasting state of great joy and peace. The Buddha said, "The extinction of desire is Nirvana." This is the ultimate goal in Buddhism. Everyone can realize it with the help of the Buddha's teachings. It can be experienced in this very life.

माणसाच्या जगण्यातले बौद्धिक सातत्य आणि कारण-परिणाम यांच्या साखळीने घडणारी त्याची मते आणि भूमिका यांतून बाहेर पडता येते, असे बुद्ध म्हणतो -- हे दुर्लक्षून चालणार नाही --

"People suffer because they are caught in their views. As soon as we release those views, we are free and we don't suffer anymore."
— Thich Nhat Hanh, The Heart of the Buddha's Teaching: Transforming Suffering into Peace, Joy, and Liberation

विश्वनिर्मितीचे कारण तर कळणे शक्यच नाही, याला आदि वा अंतही नाही -- असे आता शास्त्रज्ञ म्हणताहेत, हेही लक्षात घ्यायला हवे.

माणसाच्या बुद्धीने जगभर जगण्याची इतकी वाट लावलेली दिसत असून तुम्हाला तीबद्दल काही प्रश्न तर पडत नाहीच, उलट तुम्ही तिचा गौरव करता, हे आश्चर्याचे आहे --

म्हणजे मानवी बुद्धि हेच फक्त सत्य -- असा तुमचा निष्कर्ष आहे ! तुकारामाचा तसा नाहीय निष्कर्ष -- हे स्पष्ट आहे !

अहो, तुकाराम देव कशाला म्हणतो, तेही पाहायला हवे -- आणि मानवी मेंदूला हेतू कळू शकत नाही, असे तो म्हणतोय, इकडे लक्ष द्यायला हवे --

कोण्या कारणे हे जालेसे निर्माण -- देवाचे कारण देव जाणे
-- संत तुकाराम.

विश्वाला हेतुबितू देण्याचा आत्मगौरव करणे ही माणसाची आत्मवंचना आहे --

पूर्ण विश्वाला काहीही हेतू नाही, हेही समजले पाहिजे -- हेतू ही फक्त मानवी बुद्धीची आपमतलबी कृती असते -- आणि अशी हेतूपूर्णता मान्य केली की विषमता, हिंसा, हे सर्वच मान्य करावे लागते --

याला पुरस्कार-वापसी आणि पाकिस्तानी कलाकार -- हे संदर्भ आहेत --

साम्यवाद्यांनी, अथक परीश्रम आणि प्रचंड अभ्यास करून गधडेपणा कमावलेला असतो !

पाहायला अति-उत्सुक आहे ! हे क्वचितच कुणी घेईल असे आव्हान आहे -- पुशींची भाषा पोचवणे आणि भडक नाट्य नसलेली पण समृद्ध असलेली अशी कलाकृती सादर होणे ! लाखे हा एक समझवाला जादुगार आहे आणि प्रिया एक भाषेत पोहणारी उत्तम अभिनेत्री आहे ! आणि दोघेही यशाचा आलेख न मांडता ही कलाकृती घडवताहेत !

" आम्ही कुणाला घाबरत नाही " आणि " मुहतोड जवाब देंगे " -- ही दोन वाक्ये आता अतिवापराने गुळगुळीत झालीयत !

आनंद ही बरीचशी स्वनिरपेक्ष मन:स्थिती असते, असे म्हणता येईल --

तो लांबवण्याचा वा त्याचे मूल्यमापन करण्याचा कोणताही विचार सुरु झाला की तो आनंद खतम झालाच म्हणून समजा !

आनंदाची उदाहरणे -- सूर्यास्त पाहण्यातून, एखादी चांगली कविता लिहिण्यातून, रस्ता क्रोस करायला कुणाला मदत करण्यातून, कुणी रस्ता क्रोस करत असेल तर तोवर आपले वाहन थांबवण्यातून, काही चांगले वाचण्यातून, वगैरे --

प्रतिक्रियेतून निर्माण होणारा उन्माद म्हणजे आनंद नव्हे --

'पाणीपुरी ---- दही-बटाटा पुरी!'
हे म्हणजे चिडवणेच झाले !

बौद्धिक अर्थ द्या सोडून -- जे जाणवते, ते बघा --

मराठी कवितेच्या स्मशानाचा मीही एक पर्यटक आहे --

' भरल्यापोटी ' म्हणजे निरर्थक, असे समजले जाते -- मी नाही समाजत तसे --

इथल्या परिस्थितीशी जुळवून घ्यायचे की नाही आणि कसे, हा ज्या त्या कलावंताचा प्रश्न असतो -- अमुकच असे काही ठरलेले नसते --

मला तर वाटते की सगळ्यांनाच आपापली कर्मे, कार्ये, कृती आणि कामे भरल्या पोटीच करता यावीत -- उपाशी पोटी नाही होणार हो नीट काही --

आता वाचणारे आपापला विचार करतील -- इथल्या इथे काही सिद्ध तर होणार नाही --

कलानिर्मितीची प्रक्रिया मागणीवर आधारित असणे आणि ती तशी नसणे यांत मोठा फरक आहे -- मी त्या मूळ प्रक्रियेबद्दल बोलतोय --

किंवा प्रत्येक गोष्टीला ' बाजार ' म्हटल्याने तो शब्द वापरायची गरजच संपतेय --

आपले मतभेद आहेत --

तुकाराम, ज्ञानेश्वर, अलीकडचे मर्ढेकर, जीए, खानोलकर, काफ्का, जोहन डन, होप्किन्स, पेसोआ -- असे असंख्य अपवाद आहेत -- ब.रयाच जणांचे काम तर त्यांच्या मृत्युनतर लोकांसमोर आलेले आहे --

कसे जगायचे, ह ज्याचात्याचा प्रश्न आहे -- खरोखरच प्रश्न पडणारे लोकही असतात --

महा-परफेक्ट !

Champra Deshpande replied to Vinay Gupte's comment.
गालिबचेही तसे होते -- पण, गालिबच्या गझला धंद्याच्या नाहीत -- त्यांना सर्जक म्हणता येईल --

सर्जकता आणि धंद्याचे आडाखे हे एकच -- असे खरेच म्हणायचेय का तुम्हाला ?

तुमच्या इच्छेप्रमाणे तेही होणार आहे ! Most favoured nation चा दर्जा रद्द करण्याचे विचार चालु आहेत --

दु:ख म्हणजे काय, सगळ्या संबंधांत संघर्ष का आहेत, जगण्यातले ताण अटळ आहेत का -- असे मूलभूत प्रश्न माणसाला पडतात -- त्यांना महत्त्व देणे, ते समजून घेत राहणे -- हे सर्वांचेच जगणे सुसह्य आणि संपन्न करणारे असते ( कशावरून ? -- हे ज्याचे त्याने पाहावे -- ) तसे काहीच शक्य नसेल तर जगणे म्हणजे नरक भोगणे, हा निष्कर्ष स्वीकारणे --

मराठीतले संत-वाङमय म्हणजे सगळ्या नोबेलचे ' बाप ' लेखन आहे !

मी नुसते पाहिले हो -- सोसलेबिसले काही नाही --

आपणच केलेले असतात कायदे -- ते बदलले जाऊ शकतात !

कोर्टाचे निकाल हे स्वीकृत कायद्यावर आधारित असतात -- घटना बदला, आहे काय त्यात !

हे म्हणणारेही बरेच आहेत -- त्यांना पाठींबा मिळत नाही --

एवढे सोपे असेल तर का नाही होत ते ?

सगळ्यांना समान लेखणारा पण कुणालाच न पटणारा निकष म्हणजे -- आर्थिक मागासलेपणालाच फक्त निकष मानणे !

कुणाची शांतता महत्त्वाची हे कसे ठरवणार ?

ओबीसींचा शांतता मोर्चा, मुस्लिमांचा शांतता मोर्चा -- अशा शक्यताही समोर येताहेत !

पुढार्यांची मात्र यात पुरती गोची होणार आहे -- कुणाला कसे ' आपले ' करता येईल यावर विचार करून करून ते वेडे होतील !

काल मागासवर्गीयांचाही शांतता मोर्चा निघाला -- तोही मोठा होता !

कोणत्याही अस्मितेच्या आधारावर आरक्षण वा अधिकार मागणे शक्य असते. उदाहरणार्थ मनसे भाषिक पायावर ते चालु ठेवते. जे धार्मिक वा जातीय अल्पसंख्याक आहेत ते अशा दुसऱ्या एखाद्या अस्मितेच्या वळचणीला सहज जाऊ शकतात !
( आपल्याला न आवडणार्या गोष्टीला ' वळचण ' म्हणायची एक फॅशन आहे ! )

कोणतीही अस्मिता ही तिच्याबरोबर तिचा भूतकाळ, पूर्वग्रह, द्वेष, राग, लोभ, स्वार्थ, डावपेच आणि अर्थातच हिंसाही घेऊन येतेच ! हे नि:संशय सत्य आहे ! धर्माभिमान प्रतिगामी आणि जात्याभिमान पुरोगामी, असे काही नसते !

एकदा उपाय मान्य झाला तर अंमलबजावणी कशी करावी, हे ठरवता येईल --

नसबंदीचा उपाय सध्याही चालु असतो, असे ऐकून आहे -- पण, तो यशस्वी होताना दिसत नाही -- पिलावळ दिसतेच --
( भटकी कुत्री ).

मुळीच तसे मत नाही -- आरक्षितांना पूर्ण जागा उपलब्ध असण्यासाठी म्हणतोय -- शिवाय आरक्षणात बसू शकणारे गुणवत्ताधारकही रात्रीच्या कोलेजांना येऊ शकतीलच ना --

तो वेगळा असणार स्टाफ -- तेवढ्या नोकऱ्याही वाढतील --

काही दयाळू व्यक्ती भटक्या कुत्र्यांना बिस्किटे वगैरे खाऊ घालतात -- तशा एका व्यक्तीवर कुणीतरी संतापून हल्ला केला -- असा काही विषय होता ! दयेवरचा संताप !

तरीही ' एकनिष्ठ ' असणारे लोक मतदान करतील आणि तुम्हाला नको असलेला हमखास निवडून येईल --

म्हणजे, ताबडतोब आरक्षण जाहीर करणे वा ताबडतोब गुन्हेगारांना फाशी देणे वा ताबडतोब ऍट्रॉसिटी कायद्यात दुरुस्त्या करणे -- यांतले, ते काय करू शकतात ?

ज्यांना आरक्षण नाकारले जाते त्यांचे नुकसानच व्हायला हवे, असे तर म्हणायचे नाहीय ?

जुन्या पापांमुळेच हा आरक्षणाचा प्रश्न आहे आणि तो योग्यच आहे -- ज्यांना आरक्षण मिळणार नाही त्यांची व्यवस्था काय, हा विषय आहे -- की आता सूड म्हणून त्यांच्याशी बेफिकीरीने वागावे, असा प्रश्न आहे. अन्यत्र काही उपायही सुचवले आहेत -- ते असे --

१. त्यांना शिक्षणासाठी छोट्यामोठ्या परदेशांत पाठवणे. २. खाजगी क्लासेसमधून अभ्यास करून परीक्षांना बसू देणे. ३. जे समूह आरक्षणात येणार नाहीत त्यांना त्यांच्या मुलांसाठी वेगळ्या शिक्षणसंस्था काढू देणे.

-- किंवा आणखीही कुणाला काही सुचत असेल तर..

विचार अनेक प्रकारचे असणार, पण, लोकशाहीत संख्याबळाचेही महत्त्व असतेच --

आरक्षणाचा सगळा विचार समूह केंद्रित असतो --

असे नाही. आज कुणी शेतमजूर आहे, कुणी स्वच्छतेची कामे करताहेत, तर पिढ्या न पिढ्या त्यांनी तेच करावे, असे समजून विचार करू नये -- सर्वांची मुले शिकू इच्छितात, असे समजूनच विचार व्हायला हवा --

असे विचार पुढे यावेत म्हणूनच ही पोस्ट दिलेली आहे --

आवश्यक त्या दुरुस्त्याही होतील ना --

आरक्षण वाढवत तर जावेच लागणार आहे --

आज काय करावे तोही आहेच ना प्रश्न --

कुठे फारशी न आलेली माहिती इथे दिल्याबद्दल धन्यवाद ! आरक्षण हा एका गंभीर प्रश्नावरचा किती तुटपुंजा उपाय आहे, हेच यावरून दिसते ! मग, हे लाखोंचे मूक मोर्चे कोणत्या आशेने निघत असतील ? की शिक्षणातले आरक्षण हा आहे मुख्य मुद्दा ?

सोरी -- माझ्याकडे तीन प्रसिद्ध मराठी पेपर्स येतात -- त्यांवरून मी तसे म्हणालो -- शिवाय, वाहिन्यांवरही हा विषय पूर्णपणे थांबलेला दिसला --

आमच्या भागात अनेकदा पोलिसांची फुल टीम ड्रेसमध्ये उभी असते मंगळसूत्र चोरांना पकडायला ! शेवटी न राहवून मी विचारलेच एका पोलिसाला की अहो, तुम्ही असे सगळे ड्रेसमध्ये इथे थांबल्यावर इकडे येतील कशाला मरायला ते चोर ? तर त्याने उत्तर असे दिले की, आज इथे चोरीला अटकाव झाला की नाही ?

आता हे सगळे अधिकच खुलेपणाच्या मार्गावर आहे -- स्वत:ची मते हा प्रकार ठेवायचाच नाही -- घुसमटही नको आणि प्रांजळपणाचाही प्रश्न नाही --

एकदा ' या ठिकाणी ' आणि एकदा ' त्या ठिकाणी ' !

Champra Deshpande commented on his own post.
परिपक्वतेचे मला दिसणारे काही विशेष, सुचेल त्या क्रमाने : --
१. चांगले-वाईट, न्याय-अन्याय, सुष्ट-दुष्ट अशा द्वंद्वांची प्रत्यक्ष जगण्यात काय अवस्था असते, याचे भान असणे. बऱ्याच वेळी ही द्वंद्वे एकमेकांत मिसळलेली असतात, हे समजणे.
२. स्वतःची सुखदुःखे, रागलोभ यांतच मन सतत लडबडलेले नसणे.
३. पूर्वग्रहयुक्त दृष्टिकोण नसणे.
४. स्वतःचे मन कसे वागते यावरून एकूणच मानवी मनाची आणि त्याच्या क्रियाप्रतिक्रियांची जाण असणे.
५. नवीन काही समजायला, ऐकता यायला मनात मोकळी जागा असणे.
६. विश्वाच्या रहस्यात्मकतेची जाणीव असणे.
७. उदाहरणार्थ सूर्यस्ताचे सौंदर्य पाहायला मन जिवंत असणे.
८. न्यूनगंड वा अहंगंड यांतले वैयर्थ्य समजणे.
९. स्वतंत्रता असणे – निव्वळ समाजाच्या अपेक्षेप्रमाणेच वागले-बोलले पाहिजे, असे न वाटणे.
१०. निर्भयपणा असणे.

हे जरा नीट स्पष्ट व्हावे -- तसे म्हटले तर प्रत्येक म्हातारी व्यक्ती परिपक्व असते, असे म्हणावे लागेल.

निर्वाण म्हणजे दु:खापासून मुक्ती.

Another criticism is that Nirvana takes so long to attain and so few can do it. Neither of these criticisms correspond with the Buddha's view, on the contrary he asserted that

anyone can attain Nirvana and that if his instructions are followed sincerely and carefully one could do it within the present life.

"One thing and only one thing do I teach, suffering and the cessation of suffering". It would seem therefore that Nirvana is neither complete nothingness or existence being in the way that these words are usually used

निर्वाण म्हणजे मृत्यू ?

त्यातही आणखी एक समस्या आहे. आंबेडकरांनी स्वीकारलेल्या बौद्ध धर्मात ' निर्वाण ' ही संकल्पना ( जी मूळ बौद्ध धर्मातली सर्वोच्च मौल्यवान संकल्पना आहे ) वगळलेली आहे, म्हणे ! यावर तज्ज्ञांनी प्रकाश टाकावा.

बुद्धाने सांगितलेले निर्वाण सामाजिक असते ?

आंबेडकरांचा अस्पृश्यताविरोधी संघर्ष हा वर्गलढ्यात फूट पाडणारा आहे म्हणून साम्यवाद्यांना मान्य नव्हता. तसेच, आंबेडकरांच्या बौद्ध धर्म स्वीकारण्याला त्यांनी , ' एका निराश आत्म्याची आध्यात्मिक भूक ' म्हणून हेटाळले. आंबेडकरांना साम्यवाद्यांचे काही मुद्दे पटत असले तरी त्यांची हिंसा आणि हुकुमशाही म्हणजेच कट्टरता मान्य नव्हती -- असे वाचनात आले. ( जरी आज ते नंबर वन सहिष्णू म्हणून ' भूमिका ' घेत असले, तरी ! )
इथल्या कोणत्याही बांधिलकीवाल्याने आधी हे स्पष्ट करायला हवे की तो आंबेडकरी मार्गाचा आहे की साम्यवादी. साम्यवादी टाईप असेल तर इथले लोकशाहीप्रेमी सुरुवातीलाच त्याला उडवून लावतील. आणि लोकशाहीप्रेमी बांधिलकीवाल्याला कट्टरपणा करावा लागणार नाही. ( आता, इथेच, एक वेगळे बोलुन ठेवतो. माणसाची बुद्धी कशी तुकड्यातुकड्यांतून काम करते आणि संघर्षच कसा घडवते, याचे उदाहरण या रूपात, हीच कॉमेंट, एखाद्या ॲब्सर्ड नाटकात संवाद म्हणूनही येऊ शकते ! मानवी तपशीलांचे वैयर्थ्य आणि बुद्धीमुळे होणारी बोंब – हे यातून व्यक्त होईल. हे भान येणे महत्त्वाचे नाही, असे कुणीही बांधिलकीवाला म्हणत असेल तर त्याच्याकडे दुर्लक्षच व्हावे. )

पूर्वी जसे नीतीमार्तंड असत तसे आता बांधीलकीमार्तंड बोकाळलेले दिसतात. त्यांचा प्रभाव झुगारून काही नवी लेखकमंडळी पुढे येताना दिसताहेत -- हे एक सुचिन्ह आहे.

गज्वी म्हणतात त्याप्रमाणे, नीट माहिती गोळा केली पाहिजे, हे खरेच आहे. महाराष्ट्रातल्या विद्यापीठांतले मराठी आणि नाट्यशास्त्र हे विभाग सुरुवातीला घ्यावेत. ( महाविद्यालये, सध्या सोडून द्यावीत. ) तर या ठिकाणी गेल्या २५ वर्षांत कोणकोणती चर्चासत्रे झाली, त्यांचे विषय कोणते होते, ते ठरवणारे कोण होते, त्यांत बोलणारे कोण होते -- ही एक माहिती जमवावी लागेल. दुसरी माहिती म्हणजे या दोन विभागांचे अभ्यासक्रम, अभ्यासाला लावली गेलेली पुस्तके -- हीही एक माहिती जमवावी लागेल. विद्यार्थ्यांचे पद्धतशीर ब्रेनवॉशिंग ( मेंदूत सक्तीने काही विचारांचे रोपण करणे ) चालु आहे का, ते त्यातून कळेल. मुळात आंबेडकरांचे कला, साहित्य यांवर काय होते विचार, हेही समोर यावे लागेल. आंबेडकरांची जशी खुली, समावेशक आणि स्वागतशील भूमिका दिसते तशीच या प्रचलित बांधिलकिवाल्यांची आहे का आणि ती आचरणात आहे का, याचाही विचार व्हावा लागेल. आंबेडकरांचे विचार न पटणारे वा त्यांत काही दुरुस्ती सुचवणारे कुणी असतील तर तेही त्यांनी बोलावे. सध्याच्या बांधिलकिवाल्यांच्या मते, बांधिलकी नसलेले साहित्य कोणते, तेही त्यांनी खुलेपणाने सांगणे आवश्यक आहे. या चर्चेला जिंकण्याहरण्याच्या बालिश लढ्याचे रूप न देता, सर्व परिस्थिती आणि विचार समोर येणे गरजेचे आहे. ही चर्चा एखाद्या निष्कर्षाला पोचली पाहिजे, असे नाही. वाचक आपापले समजून घेतील.

मन ही गोष्ट अस्तित्वात आहे का, याबाबत शास्त्रही संभ्रमात आहे-- व्यक्तीमन आणि समाजमन असे द्वंद्व कितपत खरे आहे, हेही सांगता येत नाही -- तरीही, आपल्याला सोयीस्कर ते गृहीत धरून बोलत राहायचे -- हीही एक आपली सवय आहेच -- ही पोस्ट मुळात महोत्सवातल्या नाटकांबद्दल नसून त्यातल्या चर्चासत्रांबद्दल आहे --

एक तर व्यक्तिगत अनुभव व्यक्त करणे किंवा सामाजिक बांधिलकी व्यक्त करणे असे कलेचे दोनच प्रकार असतात, असे मानणे, अत्यंत चुकीचे आहे.

आणि तेवढे एकच उत्तरदायित्वाच्या योग्यतेचे ?

धन्यवाद ! पण, ते नाटक ' धर्म ' हा विषयही हाताळते – ( ढोलताशे ).

हा महोत्सव डॉ. आंबेडकरांच्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंती वर्षानिमित्त आयोजित करण्यात आला आहे. ठीक आहे. काय होते आंबेडकरांचे कला, साहित्य या बाबतींतले विचार ? मी काही त्यांच्या विचारांचा अभ्यासक नाही ( जे असतील त्यांनी जरूर यावर प्रकाश टाकावा. ) तरीही, मला खालील उतारा सापडला --

An ideal society should be mobile, should be full of channels for conveying a change taking place in one part to other parts. In an ideal society there should be many interests

consciously communicated and shared. There should be varied and free points of contact with other modes of association. In other words there should be social endosmosis. This is fraternity, which is only another name for democracy. Democracy is not merely a form of Government. It is primarily a mode of associated living, of conjoint communicated experience. It is essentially an attitude of respect and reverence towards fellowmen. - Dr. B. R. Ambedkar in 'Annihilation of Caste'

यावरून असे दिसते की आंबेडकर खुल्या आणि समावेशक विचारांचे होते. त्यांचे आणखी एक वाक्य सापडले, ते असे आहे --

"Cultivation of mind should be the ultimate aim of human existence".

यावरून असे दिसते की मनाची मशागत हे मानवी जगण्यातले सर्वोच्च ध्येय आहे, असे ते मानत होते.
हे पाहता, अशी शंका येते की आंबेडकरांचे भक्तच तर त्यांची प्रतिमा स्वत:ला परवडेल अशी संकुचित करत नसतील ?

ठराविक, साचेबद्ध विचारांमुळे मराठीचे सांस्कृतिक नुकसान होते आहे, असे वाटणाऱ्या सर्व कलावंतांनी या बाबतीत व्यक्त व्हावे -- अन्यथा, जो तो आपापले काम करतोच आहे, करत राहीलही --

हा एखाद्या विचारसरणीला पाठींबा मिळवायचा विषय नसून सांस्कृतिक क्षेत्रात मोकळेपणा आणायचा प्रयत्न असेल -- याची गरज का वाटते याची पार्श्वभूमी आधी सांगावी लागेल आणि मग, मोकळेपणा म्हणजे काय ते सांगावे लागेल --

खरे तर आता मराठीत असे काही कलावंत एकत्र आले तर ' बांधिलकीविरहितांचा जाहीरनामा ' प्रसिद्ध करायची वेळ आलेली आहे.

असे म्हटलेले नाही -- कलेचे फार मोठे क्षेत्र बहिष्कृत करण्याला विरोध आहे --

शोषणाच्या मूळ कारणात जाणे, हाही एक महत्त्वाचा प्रकार असतो --

गुरुबंधू कसे असतात, तसे आपण पेसोआबंधू !

होय -- सगळे सेव्ह करत असतो -- मुलगी इकडे माहेरी आली की हे माझे काम करून द्यायचे, हे तिच्याकडे असते --

याउपर तू विचार कर -- माझ्या मते बुद्धिप्रमाण्यावाद्यांना ग्रेट कला समजूच नाही शकत --

चांगल्या कलेतले नाविन्य कधीच संपत नाही --

बौद्धिक, वैचारिक ही नावीन्य संपणारी स्थिर गोष्ट असते --

अन्यथा कला रटाळ होईल --

सर्जकता म्हणजे वैचारिकता नव्हे -- हे महत्त्वाचे --

अशा गंभीर चर्चेत फटाफट मते देऊन किस्सा खतम करण्याची घाई करणे योग्य नाही, असे मला वाटते –
( दोन्ही देशमुख ) --

सर्जकता म्हणजे नुसती वैचारिकता नव्हे -- ते असते अज्ञात प्रदेशात शिरणे --

.
मला खरेच माहीत नाहीय – सापडल्यास इथे जरूर द्या --

राज कपूर सरळ ठेवायचा हात --

सौंदर्यदृष्टी कोणत्याही परिस्थितीत जिवंत आणि सळसळती असू शकते !

-- उलट, तर्काचा आग्रह सोडणे --

खूप लोकांनी वेडेपणा केला की तो मौल्यवान होतो !

काही मतभेद मान्य करून सोडून देणे ठीक असते कधीकधी --

लेखकाने जे लिहिले त्याचे अर्थ पुन्हा वेगळ्या भाषेत सांगत बसावे का ? आता या कवितांचे अर्थ सांगा म्हटले तर काय करावे ?

सध्या मी फॉर्मात आहे !

डी-हायड्रेशन ला तो शब्द वापरलाय -- शरीरातले पाणी नष्ट होणे --

' साक्ष मावळत्या सूर्याची ' आणि ' धागेदोरे ' -- भूलना मत --

वा ! हमारे एक छोटे ग्रुपका कलाकार ! आमचा माणूस ! अभिनंदन ! ( आनंद अलकुंटे )

शिक्षा म्हणजे मर्डरच --

तसे करणे धर्मविरोधी होईल -- " उत्सव हा उत्सवासारखाच व्हायला हवा ! "

उलट, माझे तर म्हणणे आहे की, हिंदू धर्माला वर्षातून२२ ते २५ दिवस दंगा करायला परवानगी असेल तर तितकेच दिवस सर्व धर्मांना द्यायला हवी -- उरलेल्या वेळात जमेल तेवढा विकास चालेल -- लोकांनीही तक्रार करू नये --

जगात अनेकांनी लिहिलेली अति-वास्तव कविता वाचून बघा --

मला वाटते, त्याची करणे वेगळी आहेत. सर्वांच्या प्रभावातून लेखन होणे, ही काही फक्त आजची गोष्ट नाही.

आपण पार्ल्यात त्याला भेटलो होतो -- आठवतेय ना ? स्मृतीस अभिवादन !

आपल्या इथल्या चर्चांतून एखादा निष्कर्ष निघालाच पाहिजे, असे काही नाही. प्रस्तुत विषयाच्या अनेक बाजू समोर आल्या की झाले. ह विषय तर विदीर्ण मनाने एखादा निष्कर्ष काढण्याचा नाहीच आहे. ज्यांना हे प्रश्न महत्त्वाचे वाटतील ते आपापले चिंतन चालु ठेवतील.

विश्व अनादी अनंत आहे, असे म्हणणेही अशास्त्रीय आहे -- जे शास्त्रज्ञ स्वीकारताहेत !

ठायीच बैसोनी करा एकचित्त -- हे तुकारामाबुवांनी सांगितले आहे -- तोच धर्म ! बाकी कोणत्याही कर्मकांडाची गरज नाही. विदीर्ण नसलेल्या -- एकात्म असलेल्या मनाची अलगता राहत नाही -- ते विश्वात्मक होते. त्यामुळे, आपण ज्याला मन म्हणतो तसे ते मन राहत नाही. निर्गुण, निराकार देवाबद्दल बोलतानाही त्यांनी विठ्ठलप्रतिमा मानली होती -- हे कदाचित मूर्तीपूजेला धरूनच सांगावे, म्हणून असणार. हे सगळे लक्षात न घेता होणारे लागूंचे बोलणे, फुशारकी वा शौर्याचे प्रदर्शन केल्यासारखे वाटते. निरर्थक हुशारीचे वाटते.

कोणतेही मत ही एक अपूर्णताच असणार -- सत्य नव्हे.

सगळे पूर्वग्रह, मते हे सगळे आठवणींवर आधारितच तर असते ! आठवण-रूपातच तर असते !

कोणताही प्रश्नच पडत नसेल तर प्रश्नच मिटला ! पण, आस्तिक, नास्तिक वा आपला पिंड या गोष्टी माणसाला स्थितिशील करणाऱ्या आहेत.

Champra Deshpande commented on his own post.
म्हणजे, अमुक माणूस एकात्म मनाचा आहे की नाही, हे दुसर्याने ओळखणे ? ते होऊ शकत नाही. म्हणूनच जेके म्हणतात की त्यांच्यावरही विश्वास ठेवू नका -- ते म्हणताहेत ते सत्य की असत्य ते स्वत:च्या जगण्यात पडताळा.

‘ विद्वत्तेच्या कविता ’ या शीर्षकाने मी काही कविता लिहिल्या होत्या.
त्यांतली ही एक –

मार्क्सिझम समजला की
कम्युनिझम आपोआप समजेल –
पुढे वर्षभर इतर इझम्सही बघू
धर्मांचा तौलनिक अभ्यास,
थोडेफार आधुनिक सायन्स,
भारतातल्या कादंबऱ्या

हेही विषय मनात आहेत …

उद्यापासून …

--- 000 ---

मी न कळण्याचे पीळ वाढवतोय जरा --

' घोकंपट्टी ' या नाटकाच्या तालमी चालु आहेत.

अभिनेता ह नुसता एक कुशल कामगार नसून स्वत: चिंतनशीलता असलेला एक सर्जक कलावंत असतो, असे मला दिसते. त्यामुळे, त्या दोघांचे मला मुळीच पटत नाही.

मी चुकून ' पुरोगामी ' वाचले ! डोके आऊट केलेय त्या शब्दाने !

-- आणि झुन्डीची ताकदही वापरतो --

सुसंवाद म्हटला तरी साले वादच घालत असतात !

घशासाठी खदिरादिवटी चघळत राहा --

त्या धोरणात काही दुरुस्त्या सुचवून त्यांवर चर्चा करत, या वर्षी कालहरण करता येईल का हो ?

जगणे समजण्याची प्रक्रिया अनेक प्रकारे चालु असते -- कलाक्षेत्र हे इथे एक उदाहरण म्हणून घेतलेले आहे --

दाग अच्छे होते हैं !

होय -- सगळी पात्रे संत-महात्मे असली तर सिनेमा-नाटक अवघडच आहे ! पण, हा प्रश्न त्याच्या डोक्यात येणे, हे महानच आहे !

लक्ष्मीकांत बेर्डे, सुधीर जोशी आणि नयनतारा या त्रिकुटाचे हे नाटक मी पहिले होते -- प्रकाश बुद्धिसागरने दिग्दर्शित केलेले ! महाधमाल करायचे ते !

अहो, त्या प्रश्नाबाबत शक्य ती सर्व मते / आकलने इथे यावीत हा हेतू आहे. तो प्रश्न गैरलागू का आहे, हे, अमूर्ततेचा धागा पकडून तुम्ही बोलावे -- ते सर्वांना उद्बोधक होईल -- ( आणि तो प्रश्न, माझे मत म्हणून मांडलेला नाहीय ! )

-- शब्द आणि चित्र ही दोन वेगळी माध्यमे आहेत, एवढ्यापुरते ते वाक्य नाहीय -- विशेषत: अमूर्त चित्रकलेबद्दल आहे. फोटोग्राफिक चित्रे काय किंवा बऱ्याचशा कविता काय, हे सारे ' सवयीतले समजणारे ' असते -- तसे नसलेल्या काही आशयाबाबतचा हा विषय आहे --

हो, पण, आधी -- किस बाई किस, दोडका किस -- असे आहे ना ?

मला एक माहिती हवीआहे -- ' दोडका किस ' म्हणतात आणि मग ' दोडक्याची फोड लागते गोड ', म्हणतात ! किसल्यावर फोड कशी राहील ?

फक्त गौळणींचाच कसा करणार ट्राफिक जाम ? सगळ्यांचाच करावा लागणार !

अडचणींवर मात करण्यासाठी आपण काही करतोय, याच्या भ्रमात रहायची सवय, दुसरे काय !

आम्ही दोघे ' मनोहर ' चे काम पाहायचो -- मी अर्थात नवखा होतो --

प्रेसच्या समोरच्याच सोसायटीत ते राहत – ( श्री. भा. महाबळ ).

ते तुझेही मित्र होते, हे नव्हते माहीत ! आम्ही दोघे किर्लोस्कर प्रेसमध्ये एकत्र होतो !

स्त्री-पुरुष संबंध म्हणजे काय याचा अनुभव असूनही माणसे practice करत राहतातच ना !

इंग्रजीला मराठीपेक्षा जास्त ' भाव ' देण्याची हाडीमासी भिनलेली सवय !

दि. पु. चित्र्यांच्या ' केसाळ काळेभोर पिल्लू ' या कथेवरच्या दि के बेडेकरांच्या लेखाचे शीर्षक होते, ' मराठी साहित्यातला बीभत्स गारठा ' !

करमणूक, वर्गण्या, गर्दी जमवणे आणि आपले नेतृत्व विकसित करत आपल्या चमच्यांचीही एक टीम उभी करणे -- हे सगळे साधल्याशिवाय लोकशाहीचा विकास कसा होणार ?

गावोगाव मैदाने असावी, सर्वच मुलांना खेळाचा आनंद मिळावा -- असे कुठे आहे ?

नुसते खेळण्याचा विषय नाही चाललेला -- पदके मिळवणे, विक्रम करणे, देशाचे नाव उंचावणे -- यांमुळे ती सर्व पोसलेली जनावरे होतात ! नुसता खेळाचा आनंद, असे स्वरूप राहातच नाहीय --

एक तर कोणतीही गोष्ट वाया जाऊ नये -- इतरांना पूर्ण ठेवल्याने त्यांना अधिक बरे वाटावे ( बाहेरचे कुणी आल्यास त्यांना बिस्किटांचे तुकडे कसे देणार, हेही असतेच ) -- आणि नारळवड्यांसारखे पदार्थ खाताना, तुकडे घेतल्याने, आपण केवढे किती घेतले हे कुणाला न समजल्याने वड्या जरा जास्त घेता येतात -- असे सर्व विचार मीही करतो !

राजे, राजकारणी, श्रीमंत माणसे वा देश यांनी रेडे, हत्ती, कोंबडे, कबुतरे, पैलवान, वगैरे झुंजीसाठी पोसून तयार ठेवणे -- असेच नाहीय का खेळाडूंचे स्वरूप ? ते जिंकले की आनंदाने हसावे, त्यांचा अभिमान बाळगावा, त्यांचे लाड करावे – असे ?

मश्गुल राहा !

धावक किंवा धावपटू.

होय -- हल्ली डावेही ' श्रीमंत व्हा ' म्हणताहेत ! आणि ती कौतुके मला सांगून नाही रे उपयोग !

तोच नुसता सुधारत बसले तर खेळच खलास होतो !

आपल्या लोकांना वाटते ' वय झाले ' ! असे कधी होत नसते !

तेही सोडा -- नुसते चालणे घ्या ( पुण्यातल्या ) रस्त्यातून ! किंवा रस्ता ओलांडणे घ्या ! पादचाऱ्याइतके साहसी कुणी असूच शकत नाहीत !

एके काळी बा. सी. मर्ढेकर इस्माईल मध्ये शिकवायला होते -- त्या कोलेजच्या वार्षिकाचे ' The Palms ' हे नाव त्यांनी ठेवलेले आहे. विषयांतराबद्दल माफी असावी.

त्या शब्द ऐवजी ' वलययुक्त ' म्हणू --

आमच्याकडेही तिथेच एकदा एका सापाने उंदीर पकडला -- चिर्रर चिर्रर अस आवाज आला -- हा नेहमीचा नव्हता आवाज -- मग मात्र आमचे शहरी धाबे दणाणले ! लगेच घर बदलले !

एका खेड्यात बदली झालेली असताना पहिले मिळेल ते घेतलेले भाड्याचे घर धाब्याचे होते. रात्री झोपल्यावर छपराच्या जागेतून सारखे उंदीर जात -- सरसर, खसखस वगैरे आवाज येत. पहिले दोन दिवस झोपच लागली नाही -- मग मात्र, जाऊ दे, मरू दे म्हणून दुर्लक्ष करायला सुरुवार केली --

एक तर त्याची फारशी आच नसणे किंवा त्या बाबतीतली कुवतच कमी असणे किंवा ते दोन्ही असणे -- असे असू शकेल --

या अर्थाने मी असूच नाही शकत ' खरा नाटककार ' !

माझे दुर्दैव असे उघडे पाडले गेलेय !

तो नाहीय प्रश्न -- ते नेमक्या विरुद्ध गोष्टी क्लेम करत असतात ! इतरांच्या ढोंगीपणावर जर हे सदोदित बोलु शकतात तर यांचे काय आहे, हे पाहायला नको ?

बुद्धीचा त्याग करावा, असे म्हणणेच नाहीय --

आज माझ्या घराजवळच्या अण्णाभाऊ मध्ये प्रयोग आहे -- मी पाहणार आहे – ( स्ट्रॉबेरी ).

' कवितेतील अ-भाव ' या माझ्या लेखात मीही यावर लिहिले होते.

समीक्षार्क ! माधव आचवलांचे ' जास्वंद ' हे पुस्तक या दृष्टीने अद्वितीय आहे !

अध्यात्म म्हणजे बुद्धीवरची श्रद्धा संपल्याने सुरु होणारा शोध.

यात्रा, जत्रा, पूजाअर्चा, अभिषेक, सत्यनारयण, गणेशोत्सव, हुंडी, वगैरे सर्व म्हणजे अध्यात्म, हे आधी डोक्यातून काढून टाकायला हवे. नुसत्या टिंगल-टवाळ्या आणि उपरोध यांचा हा विषय नाही. सर्वांनीच योग्य त्या गंभीरपणे बोलावे, असे वाटते. जगातल्या अनेक जीनियस लोकांनी या विषयाला दिलेले महत्त्व विसरू नये.

नुसते बौद्धिक रचना नसणारे पण अर्थपूर्ण असलेले -- या अर्थाने वर उल्लेख केलेले लोक बघ --

बुद्ध, ज्ञानेश्वर, तुकाराम, गोंदवलेकर, कांबळी, ओशो, जेके -- हे सर्व हवेत गोळीबार करणारे आणि भरल्या पोटी गप्पा मारणारे ? आणि सार्त्रचा नथिंगनेस -- गप्पा ?

त्यापेक्षा अतिरेक्यांचा, युद्धातला खरा गोळीबारच बरा !

विज्ञानही फेल गेलेय मानवी संबंधांच्या प्रश्नावर --

सांगा हो बिनधास्त --

सर्व मानवी संबंधांत संघर्ष का आहेत ? जगातली हिंसा, अत्याचार, विषमता यांचे विज्ञान का नाहीय ? या प्रश्नांवर वैज्ञानिक उपाय कोणते आहेत ? आणि हे तर गप्पांचे विषय नसून आपल्या बुडाशी जाळ करणारे विषय आहेत !

मानवी संबंधांचे ज्ञान, याचे विज्ञान असू शकते का ?

' गुमराह ' मधली गाणीही छान आहेत -- ( संगीत -- रवी. )

' हम को तो सफर प्यारा
मंजिल का खुदा हाफिज ' -- असेच असायला हवे जगणे --

निसर्गासह जगण्याचे क्षण वाचकालाही !

ही एक महत्त्वाची चर्चा आहे.
या विषयाबाबत सुचणारे मुद्दे वा प्रश्न –
१ लेखकाच्या आकलनसाठी बाह्य परिस्थितीच्या बदलांचा वेग मर्यादित असावा लागतो का ?
२ लेखकाला बाह्य परिस्थितीचे एक स्थिर असे बौद्धिक आकलन असावे लागते का ?
३ काळानुरूप बदलणारी परिस्थिती आणि बदलणारे आकलन यांवरच साहित्यनिर्मिती चालते का ?
४ तसे असेल तर शेक्सपियर, पिरांदेलो, आयनेस्को, बेकेट, कामू, काफ्का, तुकाराम, ज्ञानेश्वर यांच्या विरोधात विद्रोह म्हणजे काय ?
५ चांगल्या साहित्यकृतीचा विद्रोह हा फक्त मागच्या पिढीच्या कालबद्ध आकलनाबद्दल असतो की एकूणच माणसाच्या भ्रमिष्टपणाच्या विरोधात असतो ?
६ कोलटकर, नेमाडे, ढसाळ यांचा विद्रोह हा कालसापेक्ष होता की अधिक मूलभूत होता ?

' खरा माणूस ' हे वदतो व्याघाताचे उदाहरण म्हणून मुलांना शिकवावे !

यांत फक्त -- सायकल, ट्रक आणि विमान चालवता येते एवढे टाकून पुन्हा सर्च द्या -- ' हिंदी पिक्चरचा हिरो ' असे उत्तर येईल !

जगाच्या गोंधळात आणि हिंसकपणात ते कमी भर टाकतात -- स्वत:च्या जगण्याचाही विचका कमी करतात -- उत्साह, आनंद आणि नवे काही समजून घेणे यांसाठी मनात जरा मोकळी जागा ठेवतात --

ठाम नसलेले सबुरीने घेतात -- निष्कर्षांची घाई करत नाहीत -- आपण तरी बरोबर कशावरून, हा प्रश्न विचारतात -- थोडक्यात, ते या चक्राच्या जरा बाहेर असतात --

मनाच्या अर्ध्यामुर्ध्या प्रयत्नांचे अविरत वास्तव ! अर्थपूर्ण !

नागाला सकाळी दुध दिले की झाले -- मित्राला संध्याकाळनंतर खुश करावे लागते !

मित्राची तहान नुसत्या दुधावर भागत नाही, इतकेच --

माझ्या नाटकांवर असा विचार करून फारसे लिहिले गेलेले नाही. हिमांशू स्मार्तने -- Himanshu Bhushan Smart ने काही लिहिले आहे, पण अजून मी ते वाचलेले नाहीय. अशा गंभीर आणि चिंतनात्मक प्रक्रियेत आभार कसले ? ही सर्वांची मिळून तर चालणारी बाब आहे.

खरे आहे -- पण, माणूस जे जे चांगले म्हणून निर्माण करतो त्याचे असे का होत राहते, हा प्रश्न विचारावा लागतोच --

थोड्या अतिशायोक्तीने ते नीट जाणवते --

ही लोकशाही म्हणजे लोक नगण्य, असे होते आहे !

दिलीप चित्रे यांनी, त्यांनी केलेल्या काही कवितांच्या अनुवादांना ' अपभ्रंश ' हा शब्द वापरला होता, असे स्मरते.

स्वैर मध्ये अशयापासूनही काही स्वातंत्र्य घेणे होऊ शकते -- हा फरक आताच लक्षात आल्याने तो शब्द वापरलेला नाहीय --

स्वैर नाहीय -- अर्थ समजून पण शब्दश: नसलेला, असा आहे --

अशाच विषयावर आणखी एक पोस्ट देणार आहे -- मनात त्याची शब्दयोजना चालु आहे --

हे न समजणारे लोक ' लव्ह ' बद्दलच्या उपरोधात आणि टवाळीत आयुष्य खर्ची घालतात !

दुर्दैव हे की स्वत: कम्युनिस्टांना हे समजत नाही ! ते स्वत:च्या आणि दुसऱ्यांच्या दिमागांची वाट लावत राहतात !

म्हणूनच इथल्या लोकांना देवावर भरोसा ठेवावाच लागतो !

त्याचे नाव मी ' लचकमुरारी ' असे पाडले होते ! ( शम्मी कपूर ).

जगातला एकमेव लचकमुरारी !

त्याला गाणीही एकापेक्षा एक भारी मिळत गेली !

' आतले ' राहते चालु -- ' बाहेरचे ' च जरा बेभरवशी !

पूर्वी अमानवी गोष्टींबद्दल आदर, भक्ती असायची -- आता त्यांचा उपयोग मानवी पापे त्यांच्यावर ढकलण्यासाठी होतो ! शिवाय त्यांची पूजाही करत राहायचेच !

दोघांचे मिळून पूर्ण सत्य !

तुम्ही अमुक एका धर्माचे समजा अनुयायी आहात, तरी तो धर्म तुम्हाला समजला आहे याचे शिफारसपत्र कोण देणार ? त्याची पुस्तकी परीक्षा घेऊन काही उपयोग नसतो. माणूस पदवीधर होतो तसा धर्मज्ञ होऊ शकत नाही.

मेझरेबल नाही -- व्यक्तींना महत्त्वाचे -- हे बरोबर. तिला सामाजिक चळवळीचे स्वरूप असू शकत नाही. कारण समजणे सामाजिक नसते.

बुद्धामुळे वा तुकारामामुळे किती लोकांना काय कितपत समजले याचा डेटा मिळणार नाही -- आणि तो तयार कोण करणार ? तरीही, मानवी जगण्यात ही कामे अत्यंत महत्त्वाची ठरत आलेली आहेत. हे सर्वच ज्यांना पाहता क्षणी नाकारायचे असेल त्यांना ती मुभा असतेच !

हा कुणा एका व्यक्तीचा दोष नाही -- मानवी मनाचेच हे वैशिष्ट्यआहे --

पन्नास कोटी झाडे नाही का लावली ?

ये क्या चल रहा है भाई ?

ही माझी एकमेव पोस्ट जिथे ८४ लाईक्स असून एकही कॉमेंट नाहीय !

Champra Deshpande replied to Sanjay Bhaskar Joshi's comment.

हा तर्काचा प्रश्न सुटलाय का त्यात ? जरूर शोधेन --

अहो, तर्कहीन शोधाचाच विषय चाललाय, मित्रवर्य --

तर्काला तरी शब्दांचा खेळ नका म्हणू -- महत्त्व द्या त्याला --

तर्कात बसणारा तर्कहीन शोध ! भले !

तसे तर मी कुणाचाचअनुयायी नाही -- साम्यवादी जसे त्यांच्या निष्ठांविरोधात बोलल्यावर लगेच हल्ला करतात, तसे माझे काही नाही -- तरीही मानवी जगण्याबाबत अत्यंत महत्त्वाची मर्मदृष्टी असलेले जेकेंसारखे अनेक लोक मला अर्थपूर्ण वाटतात -- उदा -- तुकाराम.

Kri has got no followers !

मराठीतले सर्वोत्कृष्ट नाटक कोणते आणि सर्वोत्कृष्ट सिनेमा कोणता -- या दोन्ही प्रश्नांचे एकच उत्तर ! हा सिनेमा का नाही गेला ऑस्करला, कोण जाणे ! खरोखर, मराठीच्या एकूण इज्जतीचा पंचनामा !

We differ on whether this is mixing issues -- therefore, discussion is really impossible.

Brain is a part of body. And mind and body are not different scientifically also. JK does not use the word ' soul '.

की असे असेल -- पिणाऱ्या ( ओल्या ) बरोबर न पिणाराही ( सुका म्हणजे ड्राय ) अडचणीत येतो -- या अर्थी, दुसरेही बरोबर ठरेल ?

फारच महत्त्वाचे ! आणि असे काही घडणे शक्य आहे, ही माझी श्रद्धा नव्हे, आकलनच आहे !

खेळून झालेल्या सामन्यांवरून काय समजते, तो चाललाय विषय -- आणि काही लेखक आणि कवी यांचे असे औपपत्तिक चिंतनही चालु असते --

जे जे मर्यादित ते ते सर्व वस्तूच --

ट्रायल -- काफ्का.

हे तसे निरुपद्रवी झाले -- पण, आरती प्रभू किंवा पु शि रेगे यांची पुस्तके एखाद्या साम्यवाद्याच्या नावावर सांगितली तर अब्रुनुकसानीची केसच होईल !

खरे तर शेळीचे मूत्रही औषधी समजले जाते -- ती बिचारी मार्केटिंगमध्ये कमी पडते --

आणि चखण्याचा नैवेद्य ?

कोणत्याही उत्पादनांना देवांची नावे चालतात -- यावरून बघा --

क्या हम आपका स्केच बना सकते हैं? यहाँ क्लिक करें और अपनी तस्वीर पर एक नज़र डालें!

मानवी थोरांच्या नावे दारू, बिडी काढायला कायद्याने बंदी आहे -- देव काही इतके थोर नसतात !

आपण कशाला मरायला तिथे गेलो, हे सांगायची श्रोत्यांवर पाळी न येवो, म्हणजे झाले !

बऱ्याचदा लाईक म्हणजे ' वाचले ' असेच खरे तर असते --

शिवाय समान--हनुमान !

शब्द, शब्दकोडी वा भाषा यांवर चर्चा नसेल तरच विश्रांती मिळणार !

सगळेच किरकोळीत मोजावे असे ' भारी ' जग !

' तो लंबक म्हणजे पुस्तकाचं घड्याळ होतं. ' -- या ओळीत ही कविता साकळून, घुसळून, उन्मळून, गढूळून येते ! बद्ध असूनही सैरावैरा असणाऱ्या मन:स्थितीचे दर्शन घडवणारी कविता ! अशा विषयांना हात घालणारे कवी थोडेच दिसतात !

त्या शक्यतेला ' आध्यात्मिक ' म्हणून झिडकारायची फॅशन आहे !

मी ' भलावण ' असेच लिहितो --

' पेस्तनजी ' हा चित्रपट मात्र नासिरचाच म्हणावा लागेल --

किंग्स सर्कल म्हणजे राजाचे वाटोळे !

दर डोई उत्पन्न वाढले आणि गरिबी कमी झाली -- असे वाचनात आले.

फारच अर्थपूर्ण चिंतन ! सार्त्रची The Chips Are Down -- ही कादंबरी आठवली -- तिचा शेवट -- trying to live once again -- असा होतो !

प्रत्येक बुद्धिवाद्याचे हे असेच असते --

आणि भांग पाडण्याच्या वेळाची --

त्यामुळे ' चुकून ' हवे तिथे फोन लागू शकतात !

एक परदेसी मेरा दिल ले गया --

ह मुद्दा महत्त्वाचा आहे -- आणि दिलासा देणाराही --

जगाच्या कारभारात तडफदार सौंदर्य !

त्या वाचून दाद देणारे रोबोही तयार होवोत !

कोणती शाळा ? उत्कर्ष की डी ए व्ही ?

एक सापडला तो देतोय -- रिकामेपणा दर्शवणारे आणखीही अभंग आहेत --

देवासी लागे सकळांसी पोसावे
आम्हा नलगे खावे काय चिंता
देवा विचारावे लागे पापपुण्य
आम्हासी हे जन अवघे भले
देवासी उत्पत्ती लागला संहार
आम्हा नाही फार थोडे काही
देवासी काम लागला धंदा
आम्हासी ते सदा रिकामीक
तुका म्हणे आम्ही भले देवाहून
विचारता गुण सर्वभावे.

Nothingness -- तुकारामाच्या भाषेत ' रिकामीक ' -- हे जर अस्तित्ववादाचे सत्य असेल तर ते बौद्धिक कसे असेल ? मार्क्सवादाला असे बिनबौद्धिक काही चालते ?

किंबहुना डहाक्यांची कविता आणि तीवरील समीक्षाही जरा बाजूला ठेवून अस्तित्ववाद आणि साम्यवाद यांचे एकत्र असणे -- यावर बोलले तरी चालेल -- ज्यांना यावर काही प्रकाश टाकता येत असेल त्यांनी टाकावा, अशी विनंती पोस्ट मध्ये केलेली आहे.

याचा काही उपयोग होईल का --
Sartre's pioneering combination of Existentialism and Marxism yielded a political philosophy uniquely sensitive to the tension between individual freedom and the forces of history. As a Marxist he believed that societies were best understood as arenas of struggle between powerful and powerless groups. But as an Existentialist he held individuals personally responsible for vast and apparently authorless social ills. The chief existential virtue—authenticity—would require a person to lucidly examine his or her social situation and accept personal culpability for the choices made in this situation.

Unlike competing versions of Marxism, Sartre's Existentialist-Marxism was based on a striking theory of individual agency and moral responsibility.

बरे, ठीक, नुसता ' अस्तित्ववादाचा प्रभाव ' म्हणजे काय ?

मीही एक सेंट्रलाईटच आहे. माझ्या सुरुवातीच्या काळात मी युनियनचा एक छोटासा कार्यकर्ता होतो. आमचे नेते भाऊसाहेब दंडवते यांच्याबरोबर युनियनच्याच कामासाठी एकदा मुंबईला गेलो होतो. तेव्हा कॉ. झवेरी यांची तोंडओळख झाली होती. ते एक अत्यंत अभ्यासू आणि महत्त्वाचे नेते होते. त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन !

शिवाय मी absurdity च्या आकलनाचा उपासक असल्याने जरा खोडकरपणाही आहेच !

अस्मिता म्हणजे प्रतिगामीपणा, असे म्हणतेय का कुणी, ही उत्सुकता आहे !

एके काळची पोरेटोरे !

फुले-शाहू-आंबेडकर आणि रानडे-कर्वे-आगरकर यांचा महाराष्ट्र, असे एकाने लिहिलेले वाचले ! याला पुरोगामी म्हणावे की प्रतिगामी ?

शब्दरत्नाकर मध्ये मंगलसूत्र असेच आहे.

त्यांचाही उगम मानवी मनच -- परंपरा, सवयी, कल्पना, स्वार्थ -- या सगळ्यांसह --

मनातूनच येतात ना ते नियम ?

उमळणारे, गोठून घेणारे, गरगरणारे मनच तर असते -- ते तटस्थ कसे असेल ?

वयाचा प्रश्न नाही -- निरीक्षण अनेक गोष्टींचे चालुच असते -- स्त्रिया वर्ज्य नाहीत --

काहीही कळत नसताना अशा ओरडणाऱ्या दांडग्या बाईपुढे सहज उभे राहणे सोपे नाही ! भारत डगमगणार नाही, याचे दर्शनच !

या बाईंचा आवाज ऐकला की मन नम्रतेने भरून जाते !

तणावमुक्त होण्याचे प्रयत्न !

भेदाच्या वास्तवातून अभेदाची समज व्यक्त होणे --

साहित्याच्या निर्मितीप्रक्रियेबद्दल आहे प्रश्न --

आपण सर्व एकमेकांचे आणि स्वत:चे गुरु !

' याच्यावर तुम्ही एक नाटक लिहा ' असे तो पुढे म्हणणार, हे माहीत असते !

' भयंकर ' उद्बोधक !

दोन्ही बाजूंचे ऐकून त्या त्या बाजूचे सत्यतामूल्य न्यायालयातच ठरणे योग्य -- सामान्य माणसाने यावर मत बनवणे चुकू शकते --

जवळ तिकीट असूनही, टीसी दिसला की माझ्यात अपराधी भाव जागे होतात !

अत्यंत समंजस ! ( मला तर असे वाटते की ' नॉर्मल मन ' हे वदतो व्याघाताचेच उदाहरण आहे ! )

आलेल्या विद्यार्थ्यांवर प्रयोग नाही ना करणार ? त्याची हमी द्या --

घात आणि संहार हे दोन्ही शेवटीच येणार असे वाटल्याने घोळ होतो --

फोनेटिक कीबोर्डवर सुरू करा -- सोपे आहे --

माझ्या ‘ दिनकर पुरोहितचा खून ‘ या नाटकातले एक पात्र ‘ विचार ‘ याच विषयावर एक वैचारिक पुस्तक लिहिण्याच्या विचारात आहे. अर्पणपत्रिका, प्रस्तावना आणि पुढील सर्व प्रकरणांची नावे तयार झालेली आहेत ! आता फक्त ते पुस्तक लिहायचे बाकी आहे ! – हे असे सर्व वर्णन करून तो म्हणतो, ‘ हे सगळे झाले लिहून की मग शेवटचे प्रकरण लिहिणार – ‘ उपोद्घात !’ -- “

त्या त्या कालाकृतीतल्या आशयाच्या आव्हानावर श्रेष्ठत्व अवलंबून असते की नसते, असा प्रश्न आहे.

प्रत्येकाने आपापला सेल्फी स्वत:च काढा !

लटक्या रागाने तिला रोबो म्हटले आहे --

माझे दोन काका माझ्या आईला वाहिनी म्हणत -- बालपणी मला ते म्हणता येत नसे -- मी तिला उन्नी म्हणे -- पुढे ती सगळ्यांची उन्नीच झाली !

मृत्यूचे भान आल्याने माणूस जरा शहाणा व्हायलाच हवा -- मला असे शहाणपण यावे --

एकमेकांना परस्पर खुशीने फसवण्याची कला !

मुळात नऊ वारीला साडी म्हणतात का, हाच एक प्रश्न आहे !

अंक नुसता दर्जेदारच नाही तर संग्राह्य आणि संदर्भमूल्य असलेला असणार यात शंकाच नाही --

टीन-कनस्तर पीट-पीटकर, गला फाडकर चिल्लाना<br>
यार मेरे, मत बुरा मान, ये गाना है न बजाना है<br>
टीन-कनस्तर<br>
नाच के बदले कमर नचाना, उछलके सर्कस दिखलाना<br>
भूल है तेरी, तू समझा है दुनिया पागलख़ाना है<br>
टीन-कनस्तर

उधर से लेकर इधर जमाकर, कब तक काम चलाओगे
किसका रहा ज़माना, एक दिन महफ़िल से उठ जाओगे
नक़ल का धँधा चल नहीं सकता, एक दिन तो पछताना है
यार मेरे, मत बुरा मान, ये गाना है न बजाना है
टीन-कनस्तर

भूल गया तू, तानसेन की तान यहींपर गूँजी थी
सुर के जादूगर बैजू की शान यहींपर गूँजी थी
मरके अमर है सहगल, उसका हर कोई दीवाना है
यार मेरे, मत बुरा मान, ये गाना है न बजाना है
टीन-कनस्तर

जे. कृष्णमूर्तींची पुस्तके मराठीत आणणारे -- तेच ना ? सादर अभिवादन !

इंग्रजीतला टी एस एलीयट उदाहरण म्हणून --

कपड्यांची काटछाट करणारे सेन्सोर हवे !

त्या दोघांतले एक रत्ने, हिरे, माणके यांत खेळणारे तर दुसरे मनपातले इंजीनियर !

बुद्धीचा गंज चढणे हा पुण्याचा दुर्गुण आहेच ! कोल्हापूरच्या पावसात तो सहज धुतला जाईल ! की पुन्हा फ्रेश गुडघेनवाज !

मला त्यातले ' जुलमी संग आंख लडी ' आवडते !

चित्र : राजा बडसल.'
सर्वांगीण आवाका घेणारे अभ्यासपूर्ण लेखन ! काव्यास्वादाच्या उत्तुंग स्तराचे महान दर्शन ! मेघादूतावरून प्राण ओवाळून टाकणारा गणेशच हे करू जाणे ! प्रिय मित्र गणेश यास सादर सलाम !

पाऊस न दाखवता पाऊस दिसतोय !

देव अंतरे ते पाप -- असे तुकाराम म्हणतात.

तुकाराम याला ' रिकामीक ' म्हणतात.

माहीत नसलेल्या गोष्टींचे आपण लावू ते अर्थ !

आणि पुण्य म्हणजे काय याचे शाब्दिक उत्तर चालत असेल तर -- बुद्धाने सांगितलेले निर्वाण, जेकेंनी सांगितलेले ध्यान आणि तुकारामाने सांगितलेले एकविध मन म्हणजे पुण्य. ते कुठे असते ? आपल्या जगण्यात असू शकते, असे ते म्हणतात. पाप-पुण्याचा बाजार मांडणारे ब्राम्हण आणि त्याची खिल्ली उडवत बसण्यात धन्यता मानणारे इतर -- या मर्यादेत पुण्याचा संबंध येत नसावा !

माझे मत विचाराल तर पुण्य ही गोष्ट अस्तित्वात नाही -- मानवी मनातून फक्त पापच उदभवू शकते -- मग, ते मन कोणत्याही जातीचे असो ! ज्ञानेश्वरांनी पुण्यात्मक पाप आणि पापात्मक पाप, हे दोन प्रकार दाखवलेले आहेत !

त्या शब्दाला अवतरण चिन्ह दिलेय ! ते जरूर पाहावे !

प्रश्न विचारा -- जमेल तशी उत्तरे देईन --

याचा अर्थ, सूर्य आहे आपला पाठीराखा -- घाबरायचे कारण नाही --

एकाच नावाच्या दोन गावांपैकी अधिक मोठ्या गावाला बुद्रुक म्हणतात -- लहानाला खुर्द.

स्वत: त्याच सदोष, विकृत, हिंसक प्रक्रियेत जगत असताना, इतरांनी त्या प्रक्रियेतून बाहेर पडावे, असा सल्ला देणे वा उपदेश करणे, यात पुरुषार्थ कसला, भान कसले आणि मात करणे तरी कसले ?

Champra Deshpande commented on Shrikar Kulkarni's photo.
'श्री देवी भद्रकाली आणि मच्छिंद्र कांबळी यांच्या आशिर्वादाने
मला आज 'भद्रकाली प्रॉडक्शन्स' मध्ये 3 वर्ष पुर्ण झाली.

@[100006500621539:2048:DrGirish Oak] यांच्या मार्गदर्शनामुळे हे शक्य झाले.

खरतर 3 वर्ष हा खूप कमी कालावधी आहे पण मला भद्रकाली बरोबर

खूप वर्ष association आहे असे वाटते. खूप काही शिकलो आणि अजूनही शिकतोय.

जे थोडेफार माहीत होते, त्यात अजून नव्याने भर पडत गेली.

यासाठी परीपूर्ण व योग्य संस्था मला लाभली.

मी ज्यांच्या बरोबर काम केले आहे त्या लेखकांचे, दिग्दर्शकांचे,

कलाकारांचे, तंत्रज्ञांचे,माझ्या बॅकस्टेज मित्रांचे खूप आभार.

भद्रकाली प्राॅडक्शन्सच्या निर्मात्या आमच्या मम्मी ( श्रीमती कविता मच्छिंद्र कांबळी),

शिल्पा वहिनी, प्रिया दीदी यांचा प्रेमळ सहवासही मला सतत मिळत असतो.

आणि special thanks to, man behind me, one & only प्रसाद दादा.

दादा म्हणजे प्रेमळ, शिस्त, संयम, aggressive याचे उत्तम उदाहरण.

वेळोवेळी माझ्या अडीअडचणीला, मदतीला माझ्या पाठीशी

मोठ्या भावाप्रमाणे उभा असतो.

भद्रकाली प्राॅडक्शन्सची ही 53 नाट्यकृतींची इमारत ( आगामी 54 वी नाट्यकृती 'मास्तर ब्लास्टर')

उत्तरोत्तर शतकोत्तर होत जावो हीच मनापासून

सदिच्छा त्या इमारतीच्या एका छोट्याश्या पायरीवर मी काम करतोय

याचा मला अगदी मनापासून आनंद आणि समाधान

मिळत आहे. इथून पुढचा प्रवास मला वेगळाच अनुभव

आणि कार्यशीलता देईल यात शंकाच नाही.

#bhadrakaliproductions'

शुभेच्छा !

ही एक कादंबरीच तयार होतेय, असे समजून चला --

दरबारी कानडा म्हणताना !

विक्रेत्याची सर्दी बरी होते !

Champra Deshpande commented on Prakash Bal Joshi's photo.
'Igatpuri rains is one of my favourite painting based on my experience of rainy season in Igatpuri known as Cherapunji of Maharashtra. Unfortunately i have lost the painting and do not know where it is. Hope it is in safe hands ...'
जबरदस्त चित्र !

व्यक्तिगत अनुभवातून येणारी प्रतिक्रिया -- राग, प्रेम इत्यादी देणे वेगळे आणि त्या अनुभवाच्या निमित्ताने जगण्याकडे पाहणे वेगळे. ते पाहणे म्हणजे चिंतनशीलता.

आपले अज्ञान किती मोठे आहे हे समजत जाणे म्हणजेच ज्ञानात भर पडत जाणे !

H. G. Wells या लेखकाची In the country Of The Blind नावाची एक दीर्घकथा आहे.

प्रत्येकाने स्वत:च आपापला सेल्फी काढा !

पायाचा तळवा जमिनीवर टेकतो किती -- हेही येते.

अंगलक्षणांमध्ये सगळे येते.

सापडलेसे वाटले तरी शोध चालु ठेवावा -- जिज्ञासा महत्त्वाची --

आंतरिक सौंदर्याची वाट लागत असताना बाह्य सौंदर्याची गरज वेगाने वाढणे !

फ्रेंडसचे हाल करायचे हा सुप्त हेतू पक्का ठेवायचा मनात -- बास -- घाल ती पोस्ट वैचारिकच असेल !

सदिच्छा ! माझ्या आईचेही असेच कमीजास्त चालु आहे --

Champra Deshpande commented on Ratnakar Mahajan's post.
मी तर ते काही पहिले नाही, पण, जाने दो -- तुम्ही नेहमी समतोल असता, हे आम्ही पाहतोच --

लोकांना कापायचे काही तंत्र शोधा -- कधीही कापलेत तरी पैसे मिळतील !

निर्मिती आणि समीक्षा -- यांबाबत ?

सांस्कृतिक क्षेत्र आणि मतदारांची संख्या यांचा संबंध लावणे अवघड वाटते. तरीही, सांस्कृतिक क्षेत्रात समाजवाद्यांना स्थान नाही, हे साधारण कधीपासून ?

Champra Deshpande commented on his own post.
Dr. Dean Ornish has introduced millions to yoga's health benefits through his famous studies showing that heart disease can be reversed through diet, meditation, group support, and yoga, published in Dr. Dean Ornish's Program for Reversing Heart Disease (Ballantine, 1992).

Research continues to show that yoga is a very helpful healing tool in cultivating a healthy heart. In the Ornish program, Yoga is one of the four basic lifestyle pillars that have been proven to stop and even reverse the effects of heat disease.

The yoga practices used in the Ornish program have roots in Integral Yoga, founded by Swami Satchitananda. This style of yoga favors a calm, meditative approach. It was chosen by Dr. Ornish because of the value the specific techniques have in reducing stress, which is a major risk factor in heart disease.

मूर्ख कोण आणि शहाणे कोण, हे कळणे, हाच तर प्रोब्लेम नसेल ?

गतकातरता !

आपल्याला चांगले म्हटले जातेय ( म्हणून तर पुढचे सात जन्म मागताहेत ) त्यामुळे त्याला ' नको ' तर म्हणता येत नाही , पण, त्या वटामुळे ( तसे काही खरे झाल्यास ) आपली वाट लागतेय, हेही कळत असते !

उरलेले दिवस लाचलुचपत बंद ठेवावी !

ती अट कुणाकडूनही पाळली जाऊ शकत नाही -- बुद्धीचा आपमतलबी वापर, हेच फक्त शक्य आहे !

ज्याचीत्याची समर्थने !

विशेष म्हणजे तर्कही अनेक बाजूंनी वापरता येतो !

आज मी ब्राम्हण असल्याने धन्य झालो !

हे ' बामणाचे ' वैशिष्ठ्य समजले जाते -- पण, ' लोक काय म्हणतील ' याला महत्त्व देणाऱ्या सगळ्यांनाच हे लागू पडेल --

Champra Deshpande replied to Ashwini Gawli's comment.
'@[100000115251558:2048:Lakhe Damodar Ravidra] यांच्या एका पोष्टवरून बरीच चर्चा चालु आहे. ती वाचत असताना मी २००० साली केलेल्या " बुद्धिबळ आणि झब्बू " या @[100000669434144:2048:Champra Deshpande] यांच्या नाटकाची प्रकर्षाने आठवण झाली.

त्या नाटकातील काही संवाद....

नयनतारा - नुसता चावटपणा आहे हा !
जगदीप - नाही. तसं नाही. कुठलंही लेबल न लावता अनुभवानं शिकण्याची वृत्ती ठेव. असं सूक्ष्मपणानं वागायची गरज माणसानंच काळाच्या ओघात तयार केलेली आहे. समाज नीतीमान ठेवण्यासाठीच हा सूक्ष्मपणा चालु असतो. प्रत्येकवेळी स्त्री शरिरानीच सामील झाली पाहिजे असं काही नसतं. नुसते मनाचे सहवासही उत्सव होऊ शकतात.
नयनतारा - पण हे सगळं मला सांगायचं कारण ?
जगदीप - कारण विचारण्यापेक्षा ऐकावंस वाटतंय की नाही ते सांग.
नयनतारा - हे पेचात पकडणं झालं मग.
जगदीप - एकदा मोकळेपणा ठेवायचा म्हटलं की पेचात पकडणंही आलंच न त्यात.

नयनतारा - तू तुझा मुद्दा सोडणार नाहीस, विषयाची गोडी निर्माण केलीस पण तू माझ्यात. तरी एक गोष्ट माझ्या लक्षात आलीय. स्त्री ही एक उपभोग्य वस्तू समजतोस तू.

जगदीप - अर्थात् ! आणि स्त्रीलाही ज्या ज्या गोष्टीचं सुख, आनंद वाटतो ती ती गोष्ट तिच्या बाबतीत उपभोग्यच असते. ज्या ज्या गोष्टींचं सातत्य आपल्याला आवडतं ते ते सगळं उपभोग्यच असतं. उदाहरणार्थ आपलं आयुष्य ! उपभोग्यच ! आपलं स्वतःचं सातत्य टिकवण्यासाठी आपली धडपड असते. म्हणजे आपण स्वतःही स्वतःला उपभोग्यच ! एखाद्या गोष्टीचं आपल्याला सुख होतं, तिचं सातत्य आवडतं पण ती गोष्ट उपभोग्य नाही असं एखादं उदाहरण दे तू !

नयनतारा - तू सगळ्या गोष्टींना अनपेक्षित कलाटणी देतोस. मजा येते.

जगदीप - नुसता सहवास जरी म्हटला तरी, सुख वाटलं नाही तर प्रश्नच येत नाही; पण सुख वाटलं तर उपभोग्यपणा आलाच. एका वेगळ्या प्रकारे तो मित्रा-मित्रात किंवा मैत्रिणी-मैत्रिणीतही असू शकतो. पण, मित्र आणि मैत्रिण, किंवा स्त्री आणि पुरूष असं म्हटलं की हा एक पदर त्याला येणारच - नाकबूल केलं तरी.'

हे काय आहे ? दोन चौकोन म्हणजे ?

आणखी कुणी टच केल्यामुळे महाराज ' उठले ' नाहीत, हेच एक बरे म्हणायचे !

गिरीश पतकेने त्याच्या दिग्दर्शनाने या नाटकातला प्रत्येक सेकंद जिवंत केलेला होता !

नाटकात ! होय ! ज्यांनी हे पहिले ते अजूनही विसरलेले नाहीत !

राजेश जाधव आणि किमया चौबळ यांचा अप्रतिम अभिनय !
आणि अर्थातच गिरीश साळवी आणि गीतांजली कुलकर्णी !!
आणि मधल्या एका दृश्यात राजेंद्र बडे ! --सर्वच अत्युत्तम होते !

तो प्रयोग मात्र मी पाहू शकलो नव्हतो --

त्यासाठी चालत्या विमानात चढता-उतरता आले पाहिजे --

माझ्या मनात विचार कसे आले ते तुम्हाला सांगावेसे वाटल्याने थोडे स्पष्टीकरण --

‘ बहुजनसमाज ’ हा शब्द जातविचारतून येतो हे तर निर्विवाद सत्य आहे. वेगवेगळ्या परिस्थितींत आणि त्या त्या वेळच्या राजकीय स्वार्थावर आधारित डावपेचांप्रमाणे त्या शब्दाचे अर्थ बदलतात हेही स्पष्ट आहे. तरीही धर्मविचारातून ध्रुवीकरण करताहेत असे वाटणाऱ्यांना प्रतिगामी म्हणावे आणि जातविचारातून ध्रुवीकरण करताहेत असे वाटणाऱ्यांना पुरोगामी म्हणावे, याला फारसा अर्थ नाही. जात, धर्म, भाषा अशा विचारांतून ध्रुवीकरण करणाऱ्या सर्वांना प्रतिगामीच म्हटले पाहिजे. असे केले तर या तथाकथित पुरोगामी महाराष्ट्रात पुरोगामी किती उरतील ? आज जर कुणी ‘ बहुजनसमाज ’ हा शब्द वापरत असेल तर त्या शब्दाच्या अर्थातून तो कुणाला वगळू इच्छितो हे त्याने स्पष्ट करायला हवे. या जबाबदारीपासून पळ काढणाऱ्याला पळपुटा म्हणणे भाग आहे. याचाच पुढचा भाग म्हणजे, या शब्दाच्या अर्थाबाबत मुद्दामच संदिग्धता ठेवणे – हेतू हा की ज्यांना आपण वगळू इच्छितो त्यांचीही मते, या संदिग्धतेमुळे मिळाली तर बरेच आहे ! आपण ज्यांना टाळू इच्छितो त्यांच्याही मतांची अशी चोरटी आशा बाळगणे याला भिकारडेपणा नाही तर काय म्हणावे ? इथे फार मोठ्या उदात्त विचरांनी चालणारे नेते वा पक्ष असून त्यांतून निवड करायची आहे, असा प्रश्नच नाहीय लोकांपुढे. उदाहरणार्थ म्हणजे भ्रष्टाचारासारख्या गोष्टींना येणाऱ्या तीव्र प्रतिक्रियांचे अपवाद सोडले तर, आपल्याला न वगळणाऱ्या, आपल्याला ‘ आपले ’ वाटणाऱ्या उमेदवारांना मते द्या, एवढाच प्रमुख विचार असू शकतो. कोणते ‘ प्रतिगामी ’ आपल्याला चालतील, एवढेच ठरवायचे असते ! -- अशा विचारांतून काही शब्द ओघात वापरले गेले. माझे म्हणणे, आपल्याला जे लोक वगळणार नाहीत त्यांच्याबरोबर जाण्याचे ‘ विचारस्वातंत्र्य ’ मतदारांना ठेवले गेले पाहिजे.

आणि राजकीय लेखातही निष्कर्षातीत भान का व्यक्त होऊ नये ?

मी त्याकडे ललित लेख म्हणूनही पाहतोय, हे स्पष्ट केलेय --

विचारायची वा विचार करायची गरज नाही -- योग्य ते आपोआप घडेल --

मेनका की मनेका --

लेखकाला अभिप्रेत तेच वाचकाला पोचू शकते -- ही कल्पना कधीच मोडीत निघालेली आहे !

तो शब्द सरळ absurdity असा लिहावा, हे बरे !

आणि त्यातली ऍब्सर्डिटी न दिसणे, हे गंभीर ?

या लघुरुपांमधून त्यातली हस्यास्पदता, तथ्यहीनता, रटाळपणा -- हे सगळे व्यक्त करण्याचा लेखकाचा हेतू असावा --

अब्सर्डिटीत विनोद असतोच --

' निष्कर्षहीन ' नव्हे, निष्कर्ष काढता येत नाही, ही समज व्यक्त करणारे विश्लेषण ! त्यामुळेच तर मला ते खुले आणि महत्त्वाचे वाटले !

' मी अमुक आहे ' असे प्रत्येकाने म्हटलेच पाहिजे -- हा आग्रहच बुद्धिवादी आहे !

मी बुद्धिवादीच नाही तर पुरोगामी कुठून असणार ?

कोणत्याही प्रकारे समाजात फूट पाडण्याचे मतलबी धंदे करणे, हे गंभीरपणे घेऊन घटनाबाह्यच समजायला हवे.

हा मुद्दा जरा सविस्तर सांगा --

मानसिक समरूपता ( identification ) हा दिसतो मूळ प्रश्न -- पण, तो अध्यात्मिक म्हणून फेटाळला जाऊ शकतो --

पूर्वग्रह-बद्ध नसणे.

एकटेपणाची भीती हा एक मूलभूत प्रश्न आहे ज्याला सामोरे जाणे माणसाला टाळायचे असते --

हे सगळे खून की आत्महत्या, हेच ठरवण्याचा फक्त प्रश्न आहे !

दर्जेदार कालानिर्मितीची प्रक्रिया ही कलावंताची मते, भूमिका आणि पूर्वग्रह यांना ओलांडणारी असते -- तोच कलावंत एरवी आत्मकेंद्रित असू शकतो -- गुन्हेगारही असू शकतो -- कलावंत म्हणजे संत नव्हे, पण, सर्जकतेत आकलन आणि भान हे अमर्याद समावेशक असते. त्याच्या गुन्हेगारीची फळे कदाचित त्याला भोगावीही लागू शकतात -- त्यामुळे, कला डागाळली जायचे कारण नसते.

शेरेबाजीतले अध्वर्यू मराठीत आधीच उपलब्ध आहेत !

जागतिकीकरणाच्या आधीचे लिहायचे की झाले देशीवादी !

जेम्स जोईसची ' फिनेगंस वेक ' -- ही कादंबरी ! पानेच्या पाने विरामचिन्हांशिवाय आहेत, असे ऐकून आहे !

फक्त सहा शब्दांत कथा सांगण्याचे आव्हान अर्नेस्ट हेमिंग्वे या लेखकाने पेलुन दाखवले होते. एका बालिकेचे, कधीच वापरले न गेलेले बूट विकणे आहेत -- अशा अर्थाचे ते सहा शब्द होते. त्याची स्मृती म्हणून या सहा-शब्दी कथा आहेत.

आपण आपले जे आहे ते जगू --

नुसता ' मग्रूर ' नावाचा काढा चित्रपट -- महाराष्ट्र हेओळखून घेतील लोक !

कवी उगवण्याची भूमी अशाने अन्यायग्रस्त होईल !

बुद्धीचे कार्य अमान्य केलेले नाहीय -- हे वगळून तुम्ही बोलताहात जे अनावश्यक आहे --

या प्रश्नाला पुस्तकी उत्तर नाही -- ज्याला याची तातडी वाटेल तो शोध घेईल --

त्या ऐवजी तुम्हाला आवडेल तो शब्द घ्या -- याला पर्याय आहे का -- हा प्रश्न अटळ आहे --

प्रश्न सुटत नसूनही आपण बुद्धीचेच महात्म्य का गात राहतो -- हा प्रश्न --

प्रश्न सुटत नसला तरी बुद्धी वापरत राहणे ?

तुमचे म्हणणे तरी काय आहे ?

योग्य प्रश्न पडायला अर्थात बुद्धीच लागेल --

माझे आकलन नको आता -- तुम्ही सांगा --

यातून काही योग्य प्रश्न निर्माण होतो की नाही ? की सगळेच गृहीत धरून ढकलत राहायचे ? की प्रश्नच नाहीय ? प्रश्न वाटत असेल तर कोणता, ते सांगा ना --

माझे तुमच्यावर वर्चस्व आणि आपल्यांत बंधुभाव !

त्या दोन्हींतले द्वंद्व -- हेच तर वादाचे कारण आहे --

Champra Deshpande replied to Mukund Tanksale's comment.
धर्मवादी, बुद्धिवादी, परंपरावादी, भक्तिवादी, श्रद्धावादी -- सगळेच वर्चस्वासाठी झटत असतात -- काहीही फरक नसतो --

वर्चस्वाची इच्छा झुगारून देणारा बुद्धिवादी ? असतो ?

बुद्धी मर्यादित असते -- समावेशक वा समग्र असू शकत नाही --

बुद्धीच्या वापराशिवाय प्रेरणा -- असे काही बोलताय का तुम्ही ? फारच गूढ बोलताय !

ठीक -- मी कोणत्या प्रश्नाकडे निर्देश करतोय, हे तुम्हाला समजलेय -- तुम्ही कसा मांडाल तो प्रश्न ?

पहिली अट -- चर्चा न चिडता करायची -- दुसरी अट -- पूर्ण, म्हणजे, चर्चा निरर्थक होईपर्यंत करायची --

वर्चस्व आणि बंधुभाव या गोष्टी एकत्र येऊ शकत नाहीत, हे पटतेय का ? मी किंवा तुम्ही, कुणीही ठरवणे फालतूच असणार -- आपण समजून घेण्यासाठी बोलतोय --

विमाने, पूल, वीज, आरोग्याबाबतचे शोध -- हे नाकारण्याचा विषयच नाहीय -- जे म्हटलेलेच नाहीय त्यावर आक्षेप कशाला ?

जी गोष्ट नाश घडवतेय तिला दैवत का मानावे, हा बुद्धीनेच सुचणारा प्रश्न आहे -- इथे काही टाकण्याचा प्रश्न आलेला नाही -- आधी काय आहे ते पाहून योग्य प्रश्न तर समोर घेतला पाहिजे ! बुद्धीचे उत्पादन टाकून देण्याचा प्रश्नच नाहीय -- बुद्धी सगळ्याची वाट का लावतेय, हा प्रश्न विचारलाच पाहिजे -- जे लोक सगळेच आहे तसे गृहीत धरून चालु इच्छितात त्यांना कोण काय आक्षेप घेणार ?

माणसाच्या जगण्यात बुद्धीचे महत्त्व वादातीत असते, पण, एका मर्यादित क्षेत्रात. मानवी संबंधांच्या क्षेत्रात बुद्धीची कामगिरी नुसती निराशाजनकच नव्हे तर उपद्रवकारक आणि नाश करणारी असते. मानवी संबंधांतले संघर्ष, फूट, हिंसा, विनाश यांची कारक बुद्धीच असते. ती असंख्य प्रश्न निर्माण करते, ते हाताळताना मतभेदयुक्त उत्तरेही काढते पण ते सोडवू शकत नाही. बुद्धीचे हे हमखास अपयशी होणे ज्याला जाणवते तो बुद्धीला फायनल देव वा देवी मानत नाही. बुद्धीच माणसाच्या डोक्यात आणि जगात विदीर्णता घडवत राहते. विशेषतः आजच्या जगण्यातले हे भयानक वास्तव दिसत असूनही जो बुद्धीलाच भजणे अंतिम समजतो त्याच्याशी वाद तरी कसला घालणार आणि उपयोग काय त्याचा ?

नुसते मोघम नाही -- बुद्धीने शांतच राहावे असे -- त्यामुळेच तर आईन्स्टीन म्हणत असे की दिवसातून एकदा तरी प्रत्येकाने आकाशाकडे पाहावे ! या साध्या सत्याला हजारदा अभिव्यक्ती दिली गेली आहे आणि दिली जात राहणारच ! मानवी बुद्धी हाच एक फायनल देव असे मानणाऱ्यांना या सत्याचा उपयोग नसतो, इतकेच !

येऊ देण्यात मनाचा आधीच अलग झालेला भाग तसाच राहतो आणि तो त्याच सवयीच्या पद्धतीने काम करत राहतो --

सतत तणाव ?

हा एक अत्यंत गोंधळलेला लेखक आहे -- त्याच्या तथाकथित सर्जक लेखनातही तोच गोंधळ आहे -- हा कितीही विद्वान असला तरीही हिंसेला प्रोत्साहन देणारा आहे -- या लेखकाने माझीही करमणूक केलेली आहेच, त्याची खूप वाक्ये मजेदार असतात -- पण, हा मराठीतला मौल्यवान लेखक मुळीच नाहीय – ( नेमाडे ).

बरे, या घाणीतही तरतम करता येईल असे एखादे तत्त्वही नाहीय उपलब्ध --

आल्यावर लगेच दुष्काळाची कटकट नको, म्हणून --

असा निष्कर्ष स्वीकारला तर बंदच मग सगळे --

देव असो की देवी, पापांचा नाश करणे, क्षमा करणे -- हे त्यांचे कर्तव्यच असते -- तेही, कोणताही मोबदला न घेता !

ज्याला चावतात त्याला की स्वत:च्या -- एकाच बाजूने ?

' विच्छा माझी पुरी करा ' -- " तुझ्या आणि माझ्या मुलांनी मिळून आपल्या मुलांना मारले -- "

एकात्मता असेल तर प्रश्न नसतो, हे आधी लक्षात घ्या -- जनतेला कुठेतरी घर्षण, संघर्ष वाटतो तेव्हाच प्रश्न तयार होतो. म्हणजेच अशा प्रश्नाला किमान दोन बाजू असतातच ! त्याला गंड म्हणून हिणवण्यात अर्थ नाही. घर्षण कमी होण्याचे, समजुतीचे, डॉक्टरांचेही प्रश्न समजून घेणारे, असे विचार लागतील.

तुम्ही सांगा ना तुमच्या काय सूचना आहेत त्या -- सगळ्यांनी बोंबलत बसण्यापेक्षा ते बरे पडेल --

अति-श्रीमंतांना इथे प्रेमळ वागणूक आणि उत्तम treatment मिळत असणारच !

पूर्ण विषय पहिला पाहिजे -- नुसती समर्थने कामाची नाहीत --

आता या भरकटण्याला मी उत्तर देत नाही -- जाने दो --

विषय भरकटतोय -- नुसते एखाद्या समर्थनाच्या अंगाने बोलण्याचा हा विषय नाहीय --

झालेला खर्च वसूल कसा करणार ? त्यावरचे व्याज, काही मुद्दल आणि मस्त जगण्यासाठी पैसे -- हे सर्व कुठून मिळवणार ? सगळीकडे भ्रष्टपणा आहेच, हे म्हटलेलेच आहे. " आम्ही ला हवीत पंचतारांकित पॉश हॉस्पिटल्स.... तीही कमी किमतीत..... मग याचा ताळमेळ लावायचा कसा ??? " -- असे कोण म्हणते ? खरेच हाच आहे प्रश्न ?

एक तर ओझोन थेरपी मला माहीत नाही आणि त्यावर मी बोललेलोही नाही. दुसरे म्हणजे सर्वच क्षेत्रांत लुटालुट आहे याचा उल्लेख मी केलेला आहे – त्या अर्थानेच सर्व क्षेत्रांतले आपण हलकट असे म्हटले आहे. हे वाचणारा जो कुणी संतमहंत असेल त्याने ते स्वतःला लावून घेऊ नये, ही नम्र विनंती. तिसरे म्हणजे हा नुसताच नैतिकतेचा प्रश्न नसून परिस्थितीचाही आहे. शिक्षणासाठी झालेला प्रचंड खर्च वसूल कुठून करणार – हेही लिहिले आहे. आधुनिक उपलब्ध ज्ञानाप्रमाणे आरोग्य

सुविधा मिळण्यात अडथळे आहेत – हा विषय आहे. परिस्थिती आणि फसवणूक दोन्हींचा उल्लेख आहे. हा फक्त आरोग्य क्षेत्राचा प्रश्न आहे, असे कुठेही म्हटलेले नाही. किंवा, उपलब्ध होत जाणारे ज्ञान नाकारावे, असेही कुठे मी म्हटलेले नाही. साध्या मराठीत लिहिलेले समजून न घेता कुणी अकांडतांडव केले तर काय करावे ? त्यावर इलाज नाही.

इथे नुसता बुराईचा प्रश्न नाहीय -- परिस्थितीचाही आहे -- होणारा इतका खर्च काढणार कुठून ? पेशंटसकडूनच ना ?

खाजगी डॉक्टरांचे अनेक किस्से इथे सांगितले गेले आहेत आणि याहून बरेच लोकांना माहीतही आहेत. एखादा माणूस जुगारात वा रेसमध्ये पैसे उडवत असेल, त्याच्याशी डॉक्टरांचा काही संबंध नाही. तसले तत्त्वज्ञान बोलुन उपयोग नाही. हा खाजगी डॉक्टरांचाच फक्त प्रश्न असेल, असेही नाही. ही इस्पितळांची पोलिसी असू शकते. डॉक्टर त्या पोलीसीचे गुलाम असू शकतात. पुण्यातल्या धन्वंतरी समजल्या जाणार्या एका डॉक्टरांनी एका वयस्कर पेशंटच्या बाबतीत अत्यंत समंजस सल्ला दिल्याचे मला माहीत आहे. काही असे चांगले डोक्टरही आहेत. पण, चैनीवर पैसे उडवता तर इथे काय हरकत आहे, हे पटणारे नाही. इतर क्षेत्रांच्या बाबतीत थोडीफार आवश्यक ती माहिती घेऊन लोक निर्णय घेतात -- डॉक्टरी क्षेत्राबाबत ते शक्य नसते वा फारच कमी शक्य असते. आणि परिस्थितीच्या प्रश्नाचे काय ? झालेला खर्च वसूल कुठून करणार ? आहे का काही हास्यास्पद वा बालिश नसलेले उत्तर ?

पाहू, लोकांचे अनुभव काय, कसे आहेत ते --

प्रल्हादजी, बिल्डरही तुम्हाला निमंत्रण धाडत नसतो, तुम्ही जाता घर घ्यायला ! वा ! हे महान तत्त्व तर सगळीकडेच लागू पडेल !

कुठाय तुझी कॉमेंट ?

ते दुसऱ्यांवर प्रयोग करण्यासाठी असतात !

माझीच एक कविता -- कदाचित प्रस्तुत --

कळणे इतके सरळ असून लोकांना
कळत का नाही, हेच त्याला कळत नसे.
तो सदोदित विद्ध आणि कसावीस असे.

अन्यायाबाबत सात्त्विक संताप,

खोटेपणाबाबत जहरी क्रोध,

अज्ञानाबाबत सहानुभूतीयुक्त राग –

असा तो जगे ...

माणसाला खरे तर नीट जगणे

इतके सोपे असताना, का लोक

सगळा असा विचका करतात –

असा त्याला प्रश्न पडे ...

खूप माणसे एक तर मूर्ख किंवा

आपमतलबी असल्याचे भाव

सतत त्याच्या चेहऱ्यावर असत –

त्याच्या स्टॉकमध्ये सगळी उत्तरे असत ...

तरीही -- देशात काय – जगात काय

करोडो लोक त्याच्याकडे दुर्लक्ष करत

जगत राहात ...

शेवटी त्याला त्यांची दया येई ...

आता मात्र तो

पुरता थकून

कंटाळला आहे ...

--- ००० ---

Arun Prabhune's photo.

अंकाबद्दल अभिनंदन ! अंक चांगलाच असणार याबद्दल खात्रीच आहे ! शुभेच्छा !

अप्रतिम व्हायचा प्रयोग !

तो जोडणारा कोण आहे, ते सांगा --

म्हणजे आहे तसे, फूट पडणे चालु द्या --

मग, फूट पडण्याची बडबड बंदच व्हायला हवी ना --

मी त्यांतलाच एक समजा, आणि तुम्ही सांगा उत्तर --

भूमिका आणि अभिनेता दोन्ही चांगले असले तरीही अभिनयाची स्वतंत्र सर्जक देन असू शकतेच ! ती देन असणे वा नसणे यांत फरक असतोच !

कसलीही चिंता करण्यासाठी ही चर्चा चाललेली नाहीय --

Champra Deshpande commented on his own post.
करुणा म्हणजे व्यक्तिगत आवड-निवड, मते, फायदे-तोटे यांतून येणारी नुसती एक प्रतिक्रिया असेल तर तिला असा मूल्यात्मक दर्जा येण्याचे काहीच कारण नाही.

ठीक -- माझी मते --
१. चांगले आणि वाईट -- कृष्णधवल -- अशी माणसांची विभागणी करणे हे मला उथळपणाचे वाटते. अशा दृष्टीकोनातून कसदार सिनेमा निर्माण होणे शक्य नाही.
२. अभिनय ही एक सर्जक कला आहे -- नट-नट्यांना लमाण समजणे, हे मला पूर्ण चुकीचे वाटते.

माणसाला असो की पक्षाला, ' आत्मकेंद्र ' असावे लागते, हीच एक शोकात्मिका म्हणायची !

म्हणजे सर्व विषयांवर सर्वांनी गप्प बसावे ?

कोण माणूस आहे आणि कोण नाही, हे ठरवण्याचे अधिकार कुणाकडे असावेत ?

मला कुणाचीही बदनामी करण्यात मुळीच इंटरेस्ट नाही -- माझ्या कानांत वा मेंदूतही दोष असू शकतो -- हव्या त्या मार्गाने, हे मंजुळेजींचे विचार आहेत की नाहीत, हे पडताळून घ्यावे --

माझ्या मते या भंगार कल्पना आहेत -- अभिनेता हा स्वत: एक सर्जक कलावंत असतो यात मला मुळीच शंका नाही --

मला मंजुळे या दिग्दर्षाकाबाद्दलाच बोलायचेय असे नाही -- माणसांच्या चांगले आणि वाईट, या विभागणीबद्दल मते यावीत --

ही मंजुळे यांची मते आहेत की नाहीत हे सवडीने पडताळून घ्यावे -- सध्या या विचारांवर बोलावे --

मंजुळे द्या सोडून -- या विचारांवर बोला --

चांगला माणूस आणि वाईट माणूस यावर बोला --

तुम्हाला नावाचा प्रश्न असेल तर नाव द्या सोडून -- त्या विचारांवर बोला --

मुक्त मेंदूची मजा !

कट, कारस्थान आणि सूडबुद्धी -- हे शब्द सगळ्या पक्षांतल्या सगळ्या लोकांना पाठ आहेत !

आजारी पडू नये म्हणून --

बुद्धत्वाची निकड निर्माण झालेले अद्वितीय मन ! सर्वांनाच अशी निकड वाटो हीच या क्षणी शुभेच्छा !

असे आपले पत्ते ओपन नाही करायचे -- मी करतो का असे, पहा बरे --

म्हणजे -- सौंदर्य सारे रचनेत आहे ?

अशीही मते यावीत यासाठीच दिलीय पोस्ट -- असे सर्व मौलिक विचार वाचून जो तो आपापला बोध घेईल --

मी विचारवंत नसल्यामुळे इथे लाईक दिलेय -- जे विचारवंत होते ते, आपल्या सांगण्याप्रमाणे गेले कामाला !

परराष्ट्र धोरण ठरवावे लागेल --

हेच खरे तर सत्य आहे !

जो विचार नकोसा आहे तो घालवायचा प्रयत्न फेल होत राहतो -- दुसरा विचार सुरू केला की तो नकोसा विचार जातो -- या अर्थी आहे --

सकाळी प्रश्न नाही पडले तर दिवसभर करायचे काय ? -- हा प्रश्न टाळण्यासाठी प्रश्न पडायला नकोत ?

मीही ३ डी हा प्रथमच पहिला -- वणव्याच्या ठिणग्या थियेटरमध्ये येताहेत असे वाटत होते --

पहिल्या दृश्यातच अनेक गोष्टी प्रस्थापित केल्यात !

मीही पहिला ! अजबखाना !

विचारसरणीच्या मातीत खेळायची लहानपणी लागलेली सवय, दुसरे काय !

क्लीन चिट मिळवायची वेळच न येता कायम इतरांसारखे संशयास्पद जगता येणे कधीही उत्तम !

झाले की फिफ्टी ! आता वडगाव च्या ऐवजी पिंपळगाव ची एसटी पकडतो !

' पापात्मक पाप आणि पुण्यात्मक पाप' हा ज्ञानेश्वरांनी सांगितलेला फरक इथे वेगळ्याच प्रकारे लागू पडतो !

दुसऱ्याचा तळपाय खाजवावा --

उपदेशसुद्धा तोच तोच, आधी ठरलेला, माहीत असलेलाच असावा लागतो !

काल किंग लियर ला आला नाहीत ?

ब्राम्हण मुलगा आणि मुस्लीम मुलगी यांनी प्रेमविवाह केल्यावर मुलाच्या वडिलांनी घरात घेणे नाकारले आणि त्यांना भाड्यानेही जागा मिळत नव्हती -- हे मी पाहिलेले आहे --

काहींना टोयलेटला जायचे होते म्हणून जरा आडोशाला घेतलीय गाडी ! नंतर रिव्हर्स मारून परत जाणार !

समाजमान्य नैतिकता आपल्या जगण्यात असल्याचे बिनदिक्कतपणे सांगत राहणे !

तुमच्याही खूप कविता अशा आहेत --

'If you are rational thinker, can you be religious ? If you're believer, can you be intellectually honest ?'
The Ending of Time: Where Philosophy and Physics Meet
by Jiddu Krishnamurti
Posted by: DailyOM
The provocative and penetrating philosophical classic of science and spirituality—a discourse between the revered spiritual leader Krishnamurti and renowned physicist Dr. David Bohm, exploring the origin of human conflict and what we can do about the barriers that stand in the way of insight and consciousness, now revised and updated with a new introduction and added dialogues.

The Ending of Time is a series of important and enlightening dialogues in which Jiddu Krishnamurti and Dr. David Bohm—men from vastly different backgrounds in philosophy and physics, respectively—debate profound existential questions that illuminate the fundamental nature of existence, probing topics such as insight, illusion, awakening, transcendence, renewal, morality, the temporal, and the spiritual. Along the

way, Krishnamurti and Bohm explore a person's relationship to society and offer new insights on human thought, death, awakening, self realization, and the problem of the fragmented mind.

The Ending of Time also refers to the wrong turn humanity has taken—a state that they argue can be corrected. Though they insist that mankind can change fundamentally, they warn that transformation requires going from one's narrow and particular interests toward the general, and ultimately moving still deeper into that purity of compassion, love and intelligence that originates beyond thought, time, and even emptiness.

This updated edition, edited and revised in clear and engaging language, includes a new introduction and a conversation previously published separately which examines "The Future of Humanity."

EXCERPT

KRISHNAMURTI: How shall we start? I would like to ask if humanity has taken a wrong turn.

DAVID BOHM: A wrong turn? Well, it must have done so, a long time ago, I think.

K: That is what I feel. A long time ago... It appears that way. Why? You see, as I look at it, I am just enquiring, mankind has always tried to become something.

DB: Well, possibly. I was struck by something I once read about man going wrong about five or six thousand years ago, when he began to be able to plunder and take slaves. After that, his main purpose of existence was just to exploit and plunder.

K: Yes, but there is the sense of inward becoming.

DB: Well, we should make it clear how this is connected. What kind of becoming was involved in doing that? Instead of being constructive, and discovering new techniques and tools and so on, man at a certain time found it easier to plunder his neighbours. Now, what did they want to become?

K: Conflict has been the root of all this.

DB: But what was the conflict? If we could put ourselves in the place of those people of long ago, how would you see that conflict?

K: What is the root of conflict? Not only outwardly but also of this tremendous inward conflict of humanity. What is the root of it?

DB: Well, it seems that it is contradictory desires.

K: No. Is it that in all religions, you must become something? You must reach something?

DB: Then what made people want to do that? Why weren't they satisfied to be whatever they were? You see, the religion would not have caught on unless people felt that there was some attraction in becoming something more.

K: Isn't it an avoidance, not being able to face the fact and change the fact, but rather moving to something else – to more and more and more?

DB: What would you say was the fact that people couldn't stay with?

K: What was the fact? The Christians have said there was Original Sin.

DB: But the wrong turn happened long before that.

K: Yes, long before that. Long before that, the Hindus had this idea of karma. So what is the origin of all this?

DB: We have said that there was the fact that people couldn't stay with. Whatever it was, they wanted to imagine something better.

K: Yes, something better. Becoming more and more.

DB: And you could say that they began to make things technologically better, then they extended this, and said, 'I too must become better.'

K: Yes, inwardly become better.

DB: All of us together must become better.

K: That's right. But what is the root of all this?

DB: Well, I should think it is natural in thought to project this goal of becoming better. That is, it is intrinsic in the structure of thought.

K: Is it that the principle of becoming better outwardly has moved to becoming better inwardly?

DB: If it is good to become better outwardly, then why shouldn't I become better inwardly?

K: Is that the cause of it?

DB: That is getting towards it. It's coming nearer.

K: Is it coming nearer? Is time the factor? Time as 'I need knowledge in order to do this or that'? The same principle applied inwardly? Is time the factor?

DB: I can't see that time by itself can be the only factor.

K: No, no. Time. Becoming – which implies time.

DB: Yes, but we don't see how time is going to cause trouble. We have to say that time applied outwardly doesn't cause any difficulty.

K: It causes a certain amount – but we are discussing the idea of time inwardly.

DB: So we have to see why time is so destructive inwardly.

K: Because I am trying to become something.

DB: Yes, but most people would say that this is only natural. You have to explain what it is that is wrong about becoming.

K: Obviously, there is conflict, in that when I am trying to become something, it is a constant battle.

DB: Yes. Can we go into that: why is it a constant battle? It is not a battle if I try to improve my position outwardly.

K: Outwardly, no. It is more or less all right outwardly, but when that same principle is applied inwardly it brings about a contradiction.

DB: And the contradiction is...?

K: Between 'what is' and 'becoming what should be'.

DB: The difficulty is, why is it a contradiction inwardly and not outwardly?

K: Inwardly it builds up a centre, doesn't it, an egotistic centre?

DB: Yes, but can we find some reason why it should do so? Does it build up when we do it outwardly? It seems it need not.

K: It need not.

DB: But when we are doing it inwardly, then we are trying to force ourselves to be something that we are not. And that is a fight.

K: Yes. That is a fact. Is it that one's brain is so accustomed to conflict that one rejects any other form of living?

DB: After a while people come to the conclusion that conflict is inevitable and necessary.

K: But what is the origin of conflict?

DB: I think we touched on that by saying that we are trying to force ourselves. When we are a certain thing that we want to be, we also want to be something else that is different; and therefore we want two different things at the same time. Would that seem right?

K: I understand that. But I am trying to find out the origin of all this misery, confusion, conflict, struggle – what is the beginning of it? That's why I asked at the beginning: has mankind taken a wrong turn? Is the origin 'I' and 'not I'?

Champra Deshpande commented on Awdhoot Parelkar's post.
'If you are rational thinker, can you be religious ? If you're believer, can you be intellectually honest ?'
Dr. Bohm -- हा जगातला मोठा वैज्ञानिक जे. कृष्णामुर्तींशी चर्चा करत होताच ना ! वाचा -- The Ending of Time or The Wholeness of Life.